# ॥ वंशाचा व्यास ॥

वि. आ. खैरे



मुखपृष्ठावरील चित्र : **लिओनार्दो दा विंची** या विश्वविख्यात प्रतिभावंताचे ' माणसातली सुबद्ध प्रमाणे ' [ प्रपोर्शन्स ऑफ मॅन ] हे रेखाटन—त्याच्या महाभारतसदृश, डावखुऱ्या प्रतिमालिपीत लातिन भाषेत लिहून ठेवलेल्या टिपणवह्यांतले; ' व्यास माणूस वंशाचा ' या प्रतिमेशी अतिशय निकट वाटणारे; म्हणून उपयोजिले. युरोपीय प्रबोधनकालातला हा सर्व-जिज्ञासू कलावंत १४५२ मध्ये विवाह-हीन संबंधातून जन्मला हे त्याचे व्यासांशी आणखी साम्य.

या रेखाटनाचे छायाचित्र आणि मुखपृष्ठासंबंधी मार्गदर्शन यशवंत चौधरींनी दिले.

प्रकाशक :
भाल कोरगावकर
साधना प्रकाशन
४३०।३१ शनिवार
पुणे ४११ ०३०

---

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार
पुणे ४११ ०३०

---

© प्रयोगविषयक व इतर सर्व अधिकार :
उमादेवी विश्वनाथ खैरे, एम्. ए. यांच्याकडे
पत्रव्यवहार : साधना प्रकाशनद्वारा
आवृत्ती पहिली :
२५ डिसेंबर १९७३

---

किंमत १५ रुपये

माझ्या भावंडांना

— भाऊ.

कौरवपांडवांचे वडील धृतराष्ट्र आणि पांडु यांचा जन्म विचित्रवीर्य राजाच्या विधवा, अंबिका आणि अंबालिका यांच्यापोटी पाराशर व्यासाच्या नियोगाने झाला ही कथा महाभारतात आदिपर्वाच्या १०४–०५ या अध्यायात आली आहे. या अध्यायांपर्यंत आदिपर्वात, महाभारताची ही जन्मकथा इतर अनेकांच्या जन्मकथांबरोबर आली आहे.

हा सर्व भाग वाचीत असताना असे जाणवले की, कुळाचे किंवा वंशाचे श्रेष्ठत्व या रूढ सामाजिक मूल्यात ह्या नियोगप्रसंगाचे मूळ आहे. महाभारतकार व्यासांच्या जीवनातही या प्रसंगाला महत्त्वाचे स्थान असावे आणि त्यातच पाराशर कृष्ण, वेदव्यास आणि महाभारतकार या व्यासांच्या तीन परंपराप्राप्त भूमिकांना गुंफणारा धागा सापडतो असे वाटले. महाभारत हे त्याच्या लोकाभिमुखतेमुळे पंचम वेद पदवीला पोचले आणि व्यासांनी स्त्री-शूद्रांनाही मोक्षाधिकार जाहीर करून वेदांच्यापुढचे पाऊल टाकले. याचा उगम, याच नियोगप्रकरणातील दासीशी व्यासांचा जो संबंध झाला त्यात दिसला. या सर्व विचारातून हे नाटक जन्माला आले.

नाटकाची उभारणी करताना अनेक ठिकाणचे अखोल वाचन उपयोगी पडले. कथावस्तूसाठी आदिपर्वातला संबंधित भाग आणि चित्रावांच्या ‘ प्राचीन चरित्र कोश ’ तील नोंदी पाहिल्या. पाराशर कृष्णाचे येथे कल्पिलेले स्वरूप उभे करण्यासाठी महादेवशास्त्री जोशींच्या ‘ भारतीय संस्कृतिकोश ’तील ‘ तंत्रशास्त्र ’ ही नोंद आधाराला घेतली. त्या काळचे वातावरण चिं. वि. वैद्य यांच्या ‘ महाभारताचा उपसंहार ’ आणि डॉ. केतकर यांच्या ‘ भारतीय समाजशास्त्र ’ या ग्रंथावरून कल्पिले. नदीकोळ्यांची बोलभाषा म्हणून ‘ सुपे परगण्या ’तील जनपद बोलीचा वापर केला आहे.

तेजस्वी– पण– शीतल ज्ञानभास्कर दि. के. बेडेकर यांनी ‘ एकलव्य ’ नाटकाचे खूप कौतुक केले. त्यांची आठवण हे नाटक लिहिताना सारखी होत होती. आज त्यांच्या स्मृतीला कृतज्ञ वंदन करतो.

२५ डिसेंबर १९७३. वि. आ. खैरे

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ पौष पौर्णिमेची रात्र. शाक बेटावर झाडोऱ्यातली झाडंझुडपं तोडून तयार केलेलं एक पटांगण. त्यात मध्यभागी कुंडासारख्या जागेत पेटती शेकोटी. मागच्या बाजूला जरा पलीकडे एका गुहेचा भाग दिसत आहे. शेकोटीच्या जवळपास, खेड्यातल्या तालमीत असतो तसा गोल दगडी गोळा पडला आहे. त्यावर निष्काळजीपणं चार शेंदराची बोटं ओढली आहेत.

इथं व्हायच्या जत्रेसाठी काळ्या वर्णाची गावंढळ माणसं हळूहळू जमायला लागतात. त्यात बायकापोरं पण आहेत. शेतकरी, कारूनारू, साळी – कोळी अशी ही माणसं. त्यांचा पोशाख जत्रेसाठी म्हणून थोडा बरा इतकंच. प्रत्येकाच्या हातात काही तरी जत्रेला लागणारं सामान आहे. कुणी शेकोटीसाठी लाकूडफाटा आणतो; एकजण रश्शाचं मोठं पातेलं आणतो; दुसरा एक भरलेली घागर व्यवस्थितपणानं आणून ठेवतो. कुणाच्या हातात डफ, खंजिरी अशी वाद्यसाधनं आहेत. कुणी चावऱ्या थंडीमुळं शेकोटीजवळ हात शेकत बसतो. एकंदर वातावरण मोठं शिस्तीचं आहे असं नाही.

थोडा वेळ जातो. जिवंत झालेल्या या रानात थोडीशी स्तब्धता येते. गुहेच्या बाजूकडून दोन माणसं येत असतात. एक शंभरीच्या घरात पोचलेला पण ताठ कांबीचा साधुबाबा. दुसरा ज्वानीतला तरुण. साधुबाबांनी थंडीमुळं अंगावरचं मातट रंगाचं पांघरूण चांगलं लपेटून घेतलेलं. त्यांची चाल गंभीर, मुद्रा हसरी. तरुण आहे तो सूत. रथ चालवणारा. झोकदार पोशाख केलेला. मात्र हातात आखूडसा आसूड. आसूडकाठीला घुंगरं लावलेली. त्यांच्या आवाजाच्या तालावर त्याच्या चालण्याची लय बसत असते.

ते दोघेजण जवळ येतात तेव्हा एक पोर चिरकतं : ' बाबा आला, बाबा आला ऽ ' त्याची आई त्याला दटावते. सगळीच माणसं काहीशी

शिस्तीत येतात. साधुबाबा बसतात. आणि एकदमच सारे पुकारतात:

' उदो उदो देवी काळी
हीण शीण इथे जाळी
अन्नपाणी देई पाळी
शाक बेटा नित्ये साळी '

' उदो उदो ' असं शेवटी म्हणून सारे थांबतात आणि हवं तसं बसून घेतात.]

साधू : कसं काय मंडळी ? सगळी आली का जत्रेला ? मछंदर, मकरसेन... अरे, जालंधर दिसत नाहि तो ?

एक : कालीवर गेला जनु, मासं धरायला.

दुसरा : आज पुशी पुनवेच्या रातीला ? द्येवीचा उच्छव सोडून गेला ? याड का काय वो ?

तिसरा : पोटाची खाड रिकामी झालीऽ मंग याड नाय न काय नाय. खाईल काय घरी बसून ?

पहिला : चांदन्यात मासंबी घावत्याल नव्हं चांगलं ?

दुसरा : मासं घाऊत नायतर ससं घाऊत. बसुद्या त्याला ढवावर. त्याच्यासाठी कशाला थांबताय. करा सुरवात चला.

चौथा : ए, सुरवात करायचीच म्हनता, तर घागरीतली उलिउलि घ्यायची का ?

बाई : आता काय करू तरी ! घरी त्येच, दारी त्येच. असंऽ तरी कसंऽ ?

पहिला : मावशे, धिऊ दे ग वाईच त्याला. काकाकडल्यागत आवाज येतोय नव्हं त्याचा.

दुसरा : अरं त्येका शेकानास का मंग वाईच. नायतर त्या भगुल्यातलं रवं चाव चारदोन.

तिसरा : नायतर कनाय मावशे, त्याला जवळ घे तपल्या. [ इतरांच्या हशात त्याचे शब्द विरतात. ]

साधू : अरे, तसं पाह्यलं तर काहीही करायला हरकत नाही. पण देवीच्या नावानं जरा दम काढला तर चांगलंच, नाहि का ?

एक तरुण : [ शेजारच्याला, खालच्या आवाजात ] तरन्यापनात समदं ख्याळ खेळला असंल बाबासुधा– नाय का रं ?

साधू : अरे, मोठ्यानं बोल. भिऊ नकोस. खरं आहे तुझं. शंभर वर्षांचा झालो ना ! सऽगळे खेळ पाह्यलेत.

[ एक कोळी विमनस्कपणानं प्रवेश करतो. त्याचं जाळं जमिनीवर लोळत येतंय. दोघातिघांच्या माना त्यांच्याकडं वळतात. त्याचं कुणा-कडंच लक्ष नाही. ]

पहिला : जालंधर, अरं जाळं नीट धऽर!

[ एकदोघे हसतात. जालंधर बोलणाराकडं रागानं पाहतो. आणि धुश्शात पुढं चालतो. ]

सूत : अरं झालं काय जालंधर ? पुनवंच्या चांदण्यात देवीचं मासं मारलंस-देवीला वहायला तरी आणायचंस भल्या माणसा!

जालंधर : [ तुटकपणं ] माझं मुंडकं वाहा देवीला.

एक : जाल्या, सनासुदीचा नीट बोल वाईच.

जालंधर : [ कातवून ] सुदीतच बोलतोय बरं का. तुझ्यावानी डोकी भादरून टोंब्या नाय झालो मी.

साधू : [ प्रेमानं ] जालंधऽर, मासे आले नाहीत वाटतं जाळ्यात. होतं असं कधीकधी.

जालंधर : बाबा, मासं नव्हं– मानसं आली जाळ्यात!

अनेक : मानसंऽ ?

जालंधर : मंग मी काय सांगतोय ? अवो, तिन्हीसांजचाच गेलो व्हतो. सात पाळीला जाळं टाकलं त गाडगंभर मासं नाय घावलं. आठव्या पाळीला जाळं टाकलं ति जड लागलं. म्हनलं सुसरच आली काय बनु जाळ्यात. वर वढलं तर काय! आत मुडदा!–

एक : जि वं त ? [ अनेकांचे विचित्र हास्य ]

जालंधर : सायनासंगीत मुडदा आत वो! जाळं उलटून पान्यात लोटला आन पळायला लागलो तर पाय उचलाना. आंगातला घाम जिरस्तवर बसलो न् देवीच्या नावानं पुन्हा जाळं टाकलं.

साधू : कसला मुडदा होता रे?

जालंधर : अवो, बघायचीच छाती झाली नाही माझी आधी! फिरून जाळं वढलं तर हलकं लागलं. लांबुळकं काय तरी दिसलं. वाटलं, लांबलचक मासा लागला. हात लावला तर काय, गुडघ्यापुन खाली मानसाचा पाय कि वो! आणखी निहाळून बधितलं तर याक नुसतंच साफ मुंडकं! आन त्याला हातभर बान! तिरीमिरीनि उठलो न् धडपडत निघालो. जाळंसुधा उचलुशी वाटंना. अन् मला म्हनत्यात जाळं नीट धर!

साधू : ही त्यांचीच लढाई!

एक : कुनाची वो बाबा ?

साधू : [ स्वतःशीच ] अठरा अक्षौहिणी सैन्याची. व्यासाच्या वंशाची! कालीच्या पणत्वांची! रागालोभांची. कर्माकर्मांची. धर्माधर्मांची. माणसा-माणसांची!

[ सारेजण गप्प असतात. ]

साधू : [ हसून ] अरे, मी क्षोभलो! पळभर का होईना, चळलो! मनानं सारं भविष्य मागंच पाहिलं होतं– पण वर्तमान होऊन ते समोर उभं राहिलं तेव्हा बावरलो! आगमातून निगमात आणि त्यातून दोघांच्याही उगमात शिरलो– आणि पुन्हा धर्माच्या नावानं दोन्ही बाहू उभारून बहुजनांच्या धरतीवर परत फिरलो... तरी क्षणभर सावरलो नाही! मला हे शोभलं नाही! [ नित्याची मुद्रा करून ] अरे, घाबरू नका! जाळ्यात मुडदे येतील, गाळात मुंडकी रोवतील, कालीचं पाणी रक्ताळून लाल होईल. तुम्ही भिऊ नका. त्याला कालीचा कोप मानू नका, शाप मानू नका. उतल्यामातल्याचं रक्तमास तिला हवं होतं ते मिळून गेलं! तिचं समाधान होऊन गेलं! चला सुरवात करा तुमच्या जत्रेला. सूता, रहा उभा आख्यानाला.

सूत : कोणचं आख्यान लावू, बाबा?

साधू : आता काय विचारणं? तुझ्या तरी ध्यानात आलं ना काय झालं ते? का मी क्षोभलो ते? तर मग तेच लाव. सगळ्यांच्यासाठी तुला शिकवीत आलोय त्याचा ओनामा होऊ दे आज. कवीनं रचलं ते चवीनं शिकव यांना! लाव तुझं भारूड. अन् वाटलंच तुला, तर कर त्याचं महाभारूडसुद्धा. ऊठ अन् सांग यांना : माणसाच्या जन्मापासून चालत आलेल्या या लढाईत जय कुणाचा झाला.

[ आतापर्यंत शांत बसलेल्या समुदायात चुळबूळ सुरू होते. कुणी तरी म्हणतो : 'ऊठ रे लवकर' ]

सूत : [ उठतो. आसूड टिपीनं आसूडकाठीला गुंडाळतो. घुंगरांचा तालावर नाद करतो. ]

**नमन देवी कालीला बेट शाक बेढी तिला**
**कालियांच्या कोलियांच्या भोळ्या काळ्या माउलीला ॥**
**नमन नारायेनाला मानूसातल्या मानसाला**
**बोल्तिला, बोलवी त्याला– ऐका जै कुनाचा झाला ॥**

सांगण्याचे कारण : बोलले बाबा, सूत राहिला उभा, जत्रेच्या राती, भारुडऽ वेगळे अती, सगळ्यांना सांगण्यासाठी... ! बरं का जालंधर,

अता धीर थोडा धर, धडकं धड अन् तुटकं शीर, आलं कुठून् पाण्यावर, त्याची सगळी कथा, सांगतो तुम्हाला आता! ऐका तर– जशी का आपली काली माई तशाच नद्या वाहत्या लई. म्हणून– ऐका माझं नमन :

नारायण सर थोर नद्यामधि नद नर
काली सरस्वती व्यास नमन नदीकुलास ॥
नद्या थोर बेः फार वंश त्यात तालेवार
काळे चंद्राच्या वंशाचे गोरे अंकुर सूर्याचे ॥
चंद्रवंशी कुरु राजे हस्तीपूर गाव गाजे
राजा शांतनु नावाचा डंका तिन्ही जगी त्याचा ॥

हा राजा शांतनू, एकदा गेला शिकारीला, फिरत आला गंगातीराला; तिथं त्याला दिसली, जणू गंगादेवीची पुतळी, अन् शिकार बाजूला राह्यली...

गंगाकाठचि कोळीण तिज कुलीन भूलला
सगळे प्रण मानून राणी त्यान केली तिला ॥

तिचा प्रण तसा साधा, अस्तुरी करते तुमची आमची सुधा : मला पाह्यजे ते करीन, तू बस उगा. आणि सब्द केलास भलाबुरा तर जाईन माझ्या माहेरा...

एकधारी सुत सात तिनं टाकले पाण्यात
व्याकुळला राजा वदे – आठवा तरी राहू दे ॥
निघाली ती झिनोट्यानं पुत्र आठवा घेऊन
राजा विनवी शांतनू गंगे गंगे नको जाऊ ॥

हा आठवा, त्याचं नाव देवव्रत, आईवरून गंगेय, कोळ्यावरीच मोठा झाला. शांतनू राजा कधी शिकारीला आला अन् त्याला ओळखून संगं घेऊन आला. राज्य जोरात चाललं, पण पुन्हा काय झालं : कालीच्या काठाला शांतनू आला, तिथं पाह्यलं दाशराजाच्या मुलीला – तरण्याताठ्या कालीला; तिच्यावर तो भाळला, माझी राणी हो बोलला.

म्हणे ती पूस बापास, अट घाली तो तिर्कस
राज्य करो इचा पुत्र वंश चलो इचा मात्र ॥

थोरल्याच्या मायेनं, नाही मानलं ते राजानं, पण बापाची इच्छा पाहून, सांगितलं गंगेयानं –

बाबा राणी करा हिला राज्य सुखी नको मला
नाही करायचा लग्न वंशसुखातच मग्न ॥
कोळ्याघरची ती पोर राणी झाली कुरूंवर
चित्रांगद विचित्रक झाले तिला दोघे लेक ॥

पण पुढं एकेक घडलं :

फिरली दृष्टि देवीची वाकुडे गति राणीची
काळानं शांतनू नेला राणीचा भांग मोडला ॥
चित्रांगद करी राज्ये कुस्ती गंधर्वाशी गाजे
राजा चित्रांगद गेला पृथ्वी सोडून स्वर्गाला ॥

इकडं गंगेयाचं वचन मोठं, ते तर नाही व्हायचं खोटं, म्हणून विचित्रक कोवळा, राजा राज्याला त्या झाला. त्याला असावी अस्तुरी, चिंता गंगेय तो करी, तितक्यात आवंतणं आलं घरी, काशिराजाच्या तीन पोरी, उभ्या व्हायाच्या सोयंवरी...म्हणून गंगेया घाई करी... काशिराजाच्या लेकी तिघी, त्यांचीं नावं ती आयका : अम्बा, अम्बिका अम्बालिका. एकीहून एक सरस, आपल्या व्हाव्या म्हणून मोठी चुरस, सगळ्या राजांची पण त्यांचा विरस– केला गंगेयानं मोठा !

तोंड झुंडीस देऊन, आणल्या तिघी जिंकून
विचित्रकास देऊन टाकल्या त्या गंगेयानं ॥
अंबा करी विनवणी, शाल्व राजा माझे मनी
दुसरा मज नको कोणी– केली तिची पाठवणी ॥

इकडे काय घडे, अंबा गेली शाल्वाकडे, मला पत्कर म्हणून रडे, तर तिला म्हणतो येडे, ज्यानं तुला नेली, त्याचीच तू झाली, तुला वाटतं तसा मी काही, उष्टं मागणारा नाही. ती रागानं लाल झाली, गंगेयाच्यापाशी आली, त्यानं साद नाही दिली, म्हणून परशुरामाला घेउन् आली, दोघांची लढाई झाली, बरोबरीत सुटली, गाठ नाही तुटली, अंबा गेली रानाला देवदेव करायला ! ही तिची कथा !

अंबिका नि अंबालिका विचित्रकाच्या बायका
नाद दोघींचाही त्याला जिवापरीस लागला ॥

आधी भोग पुढे रोग त्याने विचित्रक गेला
पती नाही पुत्र नाही राहिल्या त्या झुरायला ॥
जांभूळवेट भारती कथा ही घडली अशी
पुढची सांगतो ऐशी दिसे जणू का नैनासी ॥

उदो उदो काली आई
कथा शेवटास नेई ॥

बोला ' कालीमाता की जै '

सर्वजण : काली माताकी जै.

[ पडदा ]

## अंक पहिला
### प्रवेश दुसरा

[ शान्तनूची विधवा राणी सत्यवती. तिची आणखीही नावं काली, मत्स्यगन्धा अशी. काळीसावळी पण भल्याभल्यांना भुरळ घालणाऱ्या सौंदर्याचे वयपरत्वे अवशेष बाळगणारी. विचित्रवीर्य हा मुलगा गेल्याचं ओलं दुःख डोळे कोरडे करून गिळून टाकलं, आता भविष्याच्या काळजीत. नेसण कोळणीचं.

तिची मावशी, शांतनूच्या मृत्यूनंतर भाचीची सोबत करण्यासाठी हस्तिनापुरास आली. तिच्याहून दहाएक वर्षांनी मोठी, रंगानं सावळीच. या दोघी सत्यवतीच्या खोलीत बोलत बसल्या आहेत. ]

मावशी : काले, मला बाई आता जाऊ दे.

सत्यवती : मावशे, मधिच काय ग अशी सनक येती तुला? कालीला हिवाळ्यात पूर आल्यागत.

मावशी : पंचवीस वर्सात कालीचा पूर पाह्यलास का तरी? राजाची रानी, तिला दिसंना पानी. पूरपानी बघायलाच जायचंय मला. कट्टाळा आला तुझ्या गावात. हितं वासाला मासा नाही, पाय खायला गाळ नाही का निजायला झावळाची चटई नाही. मी आपली जात्ये. बोलवू का देवडीवाल्याला, सांग त्याला गाडा जुडायला.

सत्यवती : अग, गाडा नाहीऽ, रथ म्हनत्यात त्याला. कित्ती बाऱ्या सांगितलं तुला.

मावशी : मला हाये माहिती, बोलवु का सांग.

सत्यवती : बोलव, पण मी नाही सांगायची रथ जोडायला.

मावशी : मीऽ सांगीन.

सत्यवती : तुझ्या म्हणण्यानि नाहि जोडायचा त्यो. बघ सांगून.

मावशी : धमकावीनच त्याला. रानीचासुधा धरते कान अन् गाडीवान करतो आनमान; वा ग वा!

सत्यवती : मावशे, अजून तुझं पहिल्यासारखंच. आपल्यावानि नाही हिकडं! ज्याचं त्याचं नेमून काम. धन्यानिच सांगायचं न् चाकरानिच ऐकायचं.

मावशी : बारावर तीन वर्सं राहिल्ये पन हितली चाल काई मुरत नाही. तुझ्या

बापाच्या घरी माझा सब्द खाली पडून दिला नसता कुनी. चल म्हनता चार भोयांनी पालखी पळवली असती. तिथं नसतं कुनी म्हनलं ' धनीन मागं रहाती न् बहीन तोरा दावती '. हितली रीतच येगळी. धन्याचं काज अन् चाकराला माज व्हॉड !

**सत्यवती** : अग, तसं नसतं तर तुझ्या लाडक्या कालीचा दिमाख कसा राहिला असता ? एवढा मोठा गंगेचा पण ' माते, माते ' करतो का नाही ? परवा दिशी पुन्हा सांगायला आला होता... [ चेहरा आणि स्वर एकदम बदलतो. ] मावशे, जाऊ नकोस, माझा विचित्रा गेला ना ग !... [ हुंदका येतो. ]

**मावशी** : काले, काले, गप माझ्या बाई ! दोन महिने झाले आता. तुझ्या डोळ्याचं पानी खळत नाही अजून ! किती झिजलं पोर ! आता आठव करून तरी काय व्हायचंय ? जळातला मासा तळाला गेला आता कुठं गावंल का ? का रडत्येस आता ?

**सत्यवती** : मावशे, रडू नाही तर काय करू ? वाघासारखा नवरा भेटला. मला नावंतून उचललं न् नावारूपाला आणलं. बापाचीसुद्धा आठवण होऊन नाही दिली. पट्कनं गेला.

**मावशी** : काले, अग तू दैवाची. राजाची रानी झालीस. राजा गेला तुला टाकून. माझ्यासारखं टाकलं तर न्हाई ना ? दोन पोरंलेकरं दिली देवीनं–

**सत्यवती** : कशाला दिली ? सुसरीगत वढून न्यायलाच ना ? मला लाभून द्यायची नव्हती तर दिली कशाला सांग ! प्राण जात नव्हता... म्हणाले, ' सत्ये, मी तर झालो पिकलं पान.' पन सोन्यासारख्या दोन्ही पोरांना संभाळ. ' त्यांच्याकडं बघून डोळं कोरडं केलं, तर पुन्हा पूर आला त्या डोळ्यांला. चित्रासारखा चित्रा माझा. लहानपणी बापानं ' चित्रांगऽऽद ' म्हणून हाक मारली की लांबून धावत यायचा न् ' खेळा कुस्ती माझ्यासंगं ' म्हणायचा ! कुठून ग ऽ वाद्या आला न् माझ्या लेकराला म्हनला, ' माझं नाव लावतोस ? नाव बदल तुझं. नसला बदलीत तर खेळ कुस्ती. बघू कोणचा चित्रांगद उरतोय ' तो मेला उरला – माझा चित्रा हरला ऽ !

**मावशी** : काले, अग ह्याच डोळ्यांनी बवितलं सारं. राजा गेला म्हणून गाडा लावून बोलावून घेतलंस. जनु गाळातनं काढायला धावल्ये. एक पाय वर काढला की दुसरा खोलातच गेला. काले, देवीचं नाव तुझं, पन देवीचा राग झाला बघ तुझ्यावर !

**सत्यवती** : का म्हणून ? काय केलं म्या तिचं ? नावंच्या वल्ह्यानि पाणी कापलं तिचं म्हणून ? अग, चित्रा एक नेला, विचित्राला तरी का नाही

ठेवला माझ्यासाठी ? माझा भोळा बाळा, राज्यसुद्धा नको होतं त्याला ! म्हणायचा ' आई, दादालाच करू दे राज्य. ' त्याच्या दादाचंच राज्य झालं आता. मी ही अशी. मावशे, जिवाभावाचं माणूस नाही कुणी मला आता. तू जाऊ नकोस.

मावशी : अग काले, एक सोडून दोन सुना तुझ्या; जिवाभावाचं माणूस नाही काय म्हणत्येस ? मी काय जल्माला पुरायची नाय. आता सुनाच तुला लेकाच्या जागी !

सत्यवती : त्यांला ढकल नदीत. एक मुळमुळी अन एक चिडचिडी. उपेगाच्या बी नाहीत. एक सोडून दोन केल्या तरी वांझ्याच निघाल्या.

मावशी : काले, अग ढवात गळ टाकल्यावानी आशा करीत रहावं मानसानी. बाईच खालीवर बघ, कानुसा घे. असली कुनी पोटुशी तर–

सत्यवती : वाट बघ. दिसायला वांबा न् लेकराच्या नावानं बोंबा ! न्हात्याधुत्या झाल्या त्या न्हात्याधुत्याच राहिल्या !

मावशी : त्यानला कशाला बोल लावत्येस. मेघराजात पानीच नसलं तर नदी कशी भरंल ? अन् नदीत पान्याची रड म्हनून काठावरल्यांची तडफड !

सत्यवती : दुसऱ्यांची काय तडफड व्हायचीय ? तडफड होतीय् माझी ! येवढा पण लावून राणी झाल्ये. बाबाला म्हणाल्ये होत्ये, ' दे मला तू त्याला. पण पोरं लेकरं माझी बसायला पायजेत गादीवर. नाहीतर म्हातारा नवरा गमतीला होवा कशाला ? ' अन् आता काय लागलंय् हाताला ? माझ्यामागं नाव तरी उरंल का माझं, सांग.

मावशी : काले, मेलं मंजि गेलं. जित्यापनी नीट असावं. म्होरलं कुनी पाहिलंय् ? कुडीत नाही जीव अन् नावाची कशाला हाव ?

सत्यवती : नाही मावशे, कुडी जाते, नाव तेवढं राहतं. कुडीला काडीचं मोल नाही. बघ– ह्या हस्तिनापुराच्या वेशीवर जाऊन उभी राहत्ये मी; कुणी वळखील का मला ? तेच त्या गंगेयानं एकदा ' माते ऽ ' म्हणू दे, सारा गाव लोटंल लोटांगणं घालीत ! रक्ताच्या आईबापांचं नाव ठावं नव्हतं तर काय काय भोगलं म्या ! मऽस रूप होतं. ते मिळंल मातीला. आशा होती लेकानाताच्या रूपात तरी नाव राहील. ती आशासुधा जळाली ग माझ्या विचित्रासंगं !

मावशी : अग, नावासाठी नातू होवा का तुला ? मंग नातू घे करून. मासोळी येली, पिलं झाली, माशाची उस्तावर कुनी नाहि केली !

सत्यवती : [ कानावर हात ठेवल्यासारखं करीत ] मला नको सांगू असलं काहीच्या बाही. जिवाभावाची मावशी हयेस म्हणून ऐकून तरी घेतलं. पण

मी सुद्धा उपरिचर राजाच्या बीजाची हाये. धिवराच्या नाही. भलत्यासलत्याला–

मावशी : भलत्यासलत्याला ग कशाला? अग, पूर्वापार म्हन आलीय ना चालत! भावजयीचा वटा त्यात दीरभावाचा वाटा! तुझ्या दोन सुना अन् त्यांचा दीर एवढा मोठा; त्याला का नाही सांगत!

सत्यवती : त्यानं घेतलीय शप्पत! [ थांबून ] अन् मावशे, माझ्या विचित्राच्या बायका गंगेच्याला देऊ काय ग? नाव माझं चाल्वायचंय का गंगेचं?

मावशी : काय तर [ सत्यवतीच्या आवाजात ] 'मीसुद्धा उपरिचर राजाच्या बीजाची हाये.' बाहेरचा सलतो न् घरचा पोळतो. आता कोन सांगावा तुला?

सत्यवती : जाउदे मावशी, मला सांग : ती आपल्या तिथल्या भोयाची बायको काय म्हणायची ग?

मावशी : कंची ग?

सत्यवती : ती ग. भौचक भोयीन म्हणायची सारी तिला.

मावशी : ती व्हय! अग तिचा कुवारपनचा ल्योक होता ना, तिच्यापाशीच असायचा. उगाच कुनी खोड काढली तर म्हनायची – 'दूधभाऊ न् वाटून खाऊ अशी रीतच हये. मी हाये इथं म्हनुन पोरं, नाय तर काय करत्याल नवरं'... पण तिची ग का आठवण झाली तुला? कधी नाय ती आजच...

सत्यवती : अग झाली उगंच आपली! तुझ्यासंगं बोलतानि सगळं आपल्या तिकडलं आठावतं. कालीचं पानी डोळ्यापुढं दिसतं. मासळीचा वास यायला लागतो. भाताच्या लोंब्या पोटरीला टोचल्यागत वाटतं. जाळ्याच्या गाठी बोटाला चाळवत्यात. माझ्या नावंची आठवण येती–

मावशी : मी जायला निघाली की मातर रडायला येतं–

सत्यवती : ते राहु दे. माझं ऐक. मी एकदा हरावले होत्ये आठवतं का ग तुला.

मावशी : तू इसारली असशील. मला नको पुसू. तीन दिवस चूल पेटली नाही घरात. दासबाबा पाखरावानी भिरभिरत व्हता पावसापान्यात. तिसर-दिशी मछंदराला बलं गावलं तुझं. दासानि छातीला आवळून धरलं अन् हंबरला तुझ्या नावानं. म्हनला – 'गेली माझी काली, पुरात गावली. आता नाही भेटायची मला.' अग, माघारी आलीस तर सुपाएवढा जीव झाला साऱ्यांचा. कुनी पुसलंसुधा नाही, कुठं व्हतीस अन् काय केलंस!

सत्यवती : बरं झालं पुसलं नाही... [ थांबते ]

मावशी : का बरं?

सत्यवती : काय नाही आपलं उगंचच. जाऊ दे, आता काय राहिलंय त्याचं ?

मावशी : तुझ्या बोलात नाही बोल ! कालीचं पानी खोलखोल. मला काय तळ गावतोय त्याचा ! [ आतून बारीक आवाजातली 'माताजीऽऽ' अशी हाक ऐकू येते. मागोमाग काशी दिसू लागते. ही पोरसवदा तरतरीत अशी दासी. ]

काशी : माताजी, प्रतिहारी सांगत आला होता, गंगेय महाराज येतायेत तुमच्याकडं.

सत्यवती : बरं. येऊ दे म्हणावं. जा अन् सगळ्यांना सांग, इकडं कुणी येऊ नका दोन घटका.

काशी : होय, माताजी [ ती जाते. ]

मावशी : मीसुधा जाते बाई. [ उपहासिक स्वरात ] तुमचं मायलेकरांचं हितगुज चालू द्या. त्यानि करायचं 'मातेऽ' घोगऱ्या आवाजात अन् तू म्हणायचं 'गंगेयाऽऽ' गेंगाऱ्या सुरात. कालेऽ [ तिला हसू आवरत नाही. पाळण्याच्या चालीवर ] आईच्या आधी मुलगा जल्मला, हस्तिनापुरी झाला गल्बला...

सत्यवती : [ काहीशी हसत त्याच सुरात ] मावशीबाईनी पाळणा हलवीला...

मावशी : मला नाय आता हवस. पण काले, [ पुन्हा हसू आवरत नाही. ] लेकाला लाडे मांडीवर घेई, कड्कडा मांडी मोडून जाई.

सत्यवती : अग, मोडु दे. तुझ्या मांडीवर देईन.

मावशी : मी मुळीच ठरायची नाही हितं. [ तिच्यासारखा आवाज काढीत ] 'हिकडं कुनी येऊ नका दोन घटका.' मावशी हायेच राबायला. दासी जाति पळून अन् मावशीला काढति पिळून ! त्यो पडदा का नाहि लावायला सांगितलास त्या काशीला ग ? ही बघ गेल्ये मी. [ झटक्यानं जाते. ]

सत्यवती : आईच्या आधी मुलगा जल्मलाऽ ! अन् म्हणून त्यांच्यात आडपडदा आला. सगळंच चमत्कारिक.

[ कोपऱ्यात उभा करून ठेवलेल्या पडद्याकडं जाते. वस्त्राची नेसण अशी बदलते की ती एकदम प्रौढ राजस्त्री दिसते. ]

मलाच उचलला पाहिजे. मधे लावला पाहिजे. मावशी नाकारणारच. तिच्या सरळ बायकी मनाला सावत्र मायलेकरातलाही पडदा कसा पटावा ? माझा तरी कुठं आग्रह होता. पण या गंगेयानंच ही रीत घालून दिली. मी आल्यापासूनच. ब्रह्मचारी ना तो ! पण ब्रह्मचाऱ्यानं, सावत्र आईचंसुद्धा तोंड पहायचं नसतं ? अगदी निषिद्ध असतं ते ? असलं जरी, तरी या वयात ?

त्या तरुण वयात, माशाच्या पोटासारखी नितळ अंगं असतात नरांची आणि नारींची, तेव्हा त्यांच्या चळवळीनं मोहाच्या लहरी मनाच्या डोहावर उठतही असतील – पण, काळाच्या उन्हात, सुखदुःखांच्या मिठानं, खारवलेल्या माशांसारखी ती अंगं जेव्हा ताठ अन् राठ होतात, जेव्हा त्या मनाचा डोहही कोरडा होत आलेला असतो, तेव्हा त्याच्या दगडी चिराकपारींतूनसुद्धा करुणेचे पाझर अन् समदुःखाचे ओघळच झरायला लागतात– तरी हा पडदा कशाला ? [ जरा थांबून ] पण हा काही मी उभारला नाही. मग त्याचं रहस्य मला कसं कळणार ? [ विचारात ] की हा पडदा, त्याच्यापेक्षा माझ्याच रक्षणासाठी ? माझं रक्षण ? मोहापासून ? माशाला गिळणाऱ्या नागिणीला माशाचा असला मोह पडला असता कधी !... पण हा देवमासा आहे ! नागीण डसली तरी गोगलगायीचं शिंग टोचल्यासारखा निघून जाईल तो. तिला त्याच्या शेपटालासुद्धा विळखा नाही घालता यायचा कदाचित ! [ पुन्हा विचारात ] पण तो जर एवढा सत्पुरुष असता तर असले विचार माझ्या मनातच आले नसते. तो पुरुषच आहे. वर राजपुरुष ! बांध नसलेला ओढा कसा खळाळत, फुफावत, जणू साऱ्यांना कवडीच्या मापानं मोजीत नाही तर तावडीत सापडलेल्यांचा सूड घेत चाललेला असतो – तसं तर याचं नसेल ? जन्मजात अभिमानाच्या पोटी, माझं दर्शनसुद्धा त्याला नको झालं असेल ? निदान तसं त्याला दाखवायचं असेल ? [ थांबते ] पण मी मेली कशाला याचा विचार करतेय ? त्याला मधे पडदा हवाय ना ! हा घे म्हणावं. [ पडदा उचलून आणते. ] मी पण माझ्या जागी अडग असते. पाण्यातसुद्धा पक्की बसून असायची– खडकावर पाय रोवल्यासारखी. मी नाही त्याला हार जाणार ! नखाएवढं आमिष करुन मांडीएवढ्या माशाच्या गळ्याला गळ लावणाऱ्या लोकात वाढलेय म्हणावं मी. [ तिनं ठेवलेल्या पडद्यानं रंगमंचाचे दोन भाग होतात. ती एका बाजूला वाट पहात बसते. थोड्याच वेळात शांतनूचा पुत्र, देवव्रत भीष्म अर्थात गांगेय प्रवेशतो. सत्यवती त्याला गंगेय म्हणते. ]

भीष्म : [ थोडा लवत, पडद्यापलीकडूनच ] माते, वंदन करतो.

सत्यवती : गंगेया, चिरं जीव. तुझे क्षेम आहे ना ?

भीष्म : माते, तुझ्या आशिर्वादानं सर्व क्षेम आहे.

सत्यवती : गंगेया, माझ्या आशीर्वादात एवढं बळ नाहीय. असतं तर माझ्या चित्राविचित्रांना नसता का तो लाभला.

भीष्म : माते, मी तर आशिर्वादावरच वाढलो. तेजस्वी जननीच्या, धर्मस्वी पित्याच्या आणि आता तुझ्यासारख्या मनस्वी मातेच्या आशिर्वादानीच हा देवव्रत आहे तो आहे. आता... जगन्मातेची लीला ती कोण जाणू शकेल ? माझ्या दोन्ही लाडक्या भावांना जन्मदात्या मातेच्या पदराखालून आपल्या पदराखाली नेण्यात त्या जगन्मातेचा हेतू काय हे आपल्याला कसं समजणार ?

सत्यवती : गंगेया, आपण माणसांनी माणसांच्या हेतूनं जगावं, नाही का ?

भीष्म : अवश्य. म्हणून तर क्षत्रियाला उचित अशा दंडमार्गानं त्या नतद्रष्ट चित्रांगद गंधर्वाचं कांडात् काढून आलो. आता दहा पिढ्यांपर्यंत त्याचं घराणं पुन्हा हस्तिनापूरच्या वाटेला जाणार नाही !

सत्यवती : हंऽऽ. हस्तिनापुरात राजवंशच कुठं आहे दहा पिढ्या राहायला ?

भीष्म : [ दुःखानं ] विचित्रवीर्य गेला ! शांतनूंच्या वंशाचा कोवळा कोंभ यमधर्मानं खुडून नेला ! माते, चित्रांगदाच्या मागं माझी सारी आशा विचित्रावर होती. त्याला मोठा करीन, जेता करीन, सम्राट करीन आणि कृतार्थ होऊन हिमालयात जाईन अशी आशा बाळगून होतो पण ती त्या मंत्राग्नीत जळून गेली ! माझ्याच चरित्रात काही तरी उणं पडलं; रोप कोळपलं, शेताची राखण कपाळी आली !...[ थांबून, सावरतो. ] पण माते, ओढे-ओहळ लेंडी-नाले ठार कोरडे पडले तरी गंगा भरूनच वाहते. एकेक करून माणसं गेली तरी वंश सरत नाही. वंशवनातल्या वेळूंसारखा पुन्हापुन्हा फुटतच राहतो.

सत्यवती : गंगेया, अरे इथं गंगोत्रीच आटून गेली आहे. आता ओढ्यानाल्याचंच पाणी आणून सोडल्यावाचून तिच्या जीवनाची आशा नाहीये ! अरे शेताच्या राखणदारा, माझं ऐक, नवं बी टाकल्यावाचून शेत फुलण्याची आशा नाही !

भीष्म : माते, अखेरच्या दुखण्यात महाराजांची वाचा बंद झाली तेव्हापासून मी तुझाच शब्द प्रमाण मानीत आलो आहे. तू सांगावंस आणि मी ऐकावं अशी आपली रीत आहे. सांग, आताच्या स्थितीत मी काय करावं ?

सत्यवती : गंगेया, राजावाचून राज्याला काही अर्थ आहे का ?

भीष्म : माते, हे काय विचारणं झालं ? राजाविना राज्य म्हणजे प्राणाविना देह ! राजा नसला तर घडवावा लागेल. माणूस म्हणून जगणाऱ्या प्राण्यांना माणसाच्या रूपातला ईश्वर चालता बोलता दिसावा म्हणून तर राजाची योजना झाली. तो स्वयंभू परमात्मा विश्वाचा प्रतिपाळ करतो तसाच राजा राज्याचा सांभाळ करतो. राज्य करणं म्हणजे

राजालासुद्धा भोग नसतो; तर ईश्वरी सूत्र चालवण्यासाठी अनेक सुलभ अशा भोगांचा तो त्याग असतो.

सत्यवती : होय ना ! म्हणजे असा उग्ररूपी त्याग करणारा पुरुषच राजा व्हायला योग्य असतो, नाही ?

भीष्म : अर्थात.

सत्यवती : आणि राज्याला राजा नसला तर घडवायचा राजा असाच असावा, नाही ?

भीष्म : माते, तू योग्य तेच बोलत आहेस.

सत्यवती : एवढंच नाही, गंगेया, असा थोर त्यागी पुरुष जगाच्या हितासाठी राजा होण्याचंसुद्धा आनंदानं पत्करील, नाही ?

भीष्म : मी तर म्हणेन, त्यानं पत्करावं.

सत्यवती : गंगेया, तर माझी इच्छा अशी आहे की, या राजहीन हस्तिनापुराचा राजा होण्याचं पत्करावं – तू !

भीष्म : मी ?

सत्यवती : होय, तू. अन् का नाही ? तुझ्याहून कोण आणखी योग्य आहे ? कोण आणखी त्यागी आहे सांग. राज्यावरचा आपला अधिकार तू किती सहजपणानं सोडून दिलास– जणू उकडायला लागलं म्हणून अंगावरचं उत्तरीय फेकून दिलंस !

भीष्म : आता मात्र, पिसं लागून नेसूचं फेकून देण्यासारखं हे कृत्य तू मला करायला सांगावंस याचं नवल वाटतं !

सत्यवती : ते साहजिकच आहे. जाळ्यात अडकवलेल्या माशाला कोळ्यानं मोठेपण द्यावं किंवा वागुरेतल्या काळविटाच्या त्यागाची पारध्यानं स्तुती करावी तसं हे तुला वाटत असेल, नाही ? पण तुला मनाच्या तळापासून आणि खरंखरं सांगते : माझी महत्त्वाकांक्षा मनावर स्वार होऊन तुझ्यावर पाश फेकीत होती तेव्हा माझ्या डोळ्यांना दिसत होती, मात्र तुझी पारध ! आता ती गती मंदावली आहे, धुरळा बसला आहे आणि ज्याला धरू का मारू एवढीच ईर्ष्या मन बाळगीत होतं त्याचे सगळे विशेष आता त्याला उमगायला लागलेत ! पहा... तुला राज्य नसावं हे किती सहजसहज म्हणाले. काहीसुद्धा वाटलं नाही म्हणताना ! जणू खेळातलं राज्य तुला घ्यायला सांगत होते. तुला मुलंसुद्धा नसावीत म्हटलं – ते, तुझ्या हातातल्या बाहुल्या हिसकून घ्याव्यात तशा बालिश इरेनं ! पण... पण डोळ्यांच्या बाहुल्या ओढून काढाव्यात तसे माझेच मुलगे काळानं ओढून नेले तेव्हा माझे डोळे उघडले ! कळत का नकळत तू केवढा तेजाळ त्याग केला होतास ते

जाणवून ते दिपले. त्या पवित्र अंधारीत तुझे सावत्रपणही लोपले. देवव्रता गंगेया, व्रत म्हणून, जसा आजवर माझा शब्द तू खाली पडू दिला नाहीस तसा आजही तो झेल आणि राजा होऊन या राज्याचा भार सारा पेल!

भीष्म : सत्यवती माते, शब्द पाळायचा म्हणजे अक्षरांमध्ये नुसता ध्वनी नसतो माळायचा; तऽर, शब्दांचा अर्थ असतो कृतीनं अक्षर करायचा. लोकांचं बोललेलं ऐकायचं आणि त्याप्रमाणं वागायचं असं नाही तर आपलं बोललेलं खरं करायचं हा त्याचा अर्थ असतो.

सत्यवती : तेच मी करतेय, अन् तेच तुला करायला सांगतेय. माझं पद मानलंयूस ना? मग राणी म्हणून, राजमाता म्हणून माझा अधिकार पुरवणं हे माझे कर्तव्य. माझी इच्छा पुरवणं हे तुझं कर्तव्य. मी सांगते म्हणून आता तू राजा हो.

भीष्म : माते, इतक्यातच ना तू त्यागाचं सांगत होतीस! शब्द पाळायचा असतो तो त्यागासाठी, भोगासाठी नव्हे. मग तो भोग दुसऱ्यानं देऊ केलेला का असेना! तू राणी व्हावीस म्हणून मी त्या वेळी राज्य नको म्हणून सांगितलं. त्या सांगण्याचा अर्थ सघन रूपात जतन करीत आलो. तू राणी झालीस – हे साध्य झालं, तेव्हाच तर त्याचं प्रयोजन सुरू झालं; आणि ते अजून सरलं नाही.

सत्यवती : पण गंगेया, तुझ्याकडून वचन घेणारी मीच स्वतः तुला यातून मोकळी करीत आहे ना?

भीष्म : माते ते खरं आहेही आणि नाहीही. कारण वचन दिलं होतं ते माझं मी, माझं मला. तुला नव्हे तर तुझ्यासाठी! म्हणून त्या वचनातून तू मला मोकळं करू शकत नाहीस.

सत्यवती : राणीची, राजमातेची अशी अवज्ञा मला खपणार नाही!

भीष्म : राजपदाचा मुकुट भलत्याच्या डोक्यावर ठेवायला निघालेली राणीच स्वतःच्या पदाची अवज्ञा करते आहे.

सत्यवती : म्हणजे या आपत्तीतून सुटकाच नाही? जाळ्यात गुरफटल्या माशासारखं प्राप्त स्थितीतच घोटाळून पडायचं?

भीष्म : थोडंफार तसंच. भेद इतकाच की माशाला गुंतवणारं जाळं माशानं स्वतः विणलेलं नसतं. माणसाला गुंतवणारं आशेचं, सत्तेचं आणि मोहाचं जाळं मात्र माणूस स्वतःच विणतो – पोटातून धागा काढणाऱ्या कोळ्यासारखा. आणखी हा कोळी दुसऱ्यांना त्यात पकडायला पहात असला तरी प्रत्यक्षात मात्र स्वतःच त्यात सापडायचं, हेच त्याचं नियत भाग्य!

सत्यवती : असं ! तुझी इच्छा. जाळं गुंफणारा कोळी आणि त्यात गुंतणारी माशी – दोन्ही तुला एकदमच व्हायचं असलं तर मी बापडी काय करणार ? गंगेया, हे आयुष्यभर असंच चालत राहणार ?

भीष्म : होय, माते. वचन पाळणं याचा खरा कठोर अर्थ हा असा आहे. क्षणाचा विचार, पळाचा उच्चार महाकाय गरुडाप्रमाणं अफाट पंख पसरून काळाच्या गगनातली अंतरं कायमचा तोडीत रहाणार हा त्याचा अर्थ आहे.

सत्यवती : पण महाकाय गरुड झाला तरी थोडासुद्धा कुठं पाय टेकणार नाही ? हिरवी वनराजी आणि वैराण वाळवंट यांच्या शिवेवरसुद्धा आपलं उड्डाण काही काळ रोखणार नाही ? गंगेया, धर्माच्या अंतराळात सदैव झेपावणाऱ्या गरुडा, तुझ्यासमोर विनता झालेल्या तुझ्या मातेची मागणी मान ! आयुष्यभरावर सावट आणणारी वचनमोड तुला नको असेल; पण काही क्षणांपुरता तरी तुझा आग्रह सोड.

भीष्म : माते, मला तुझ्या म्हणण्याचा बोधच होत नाही. गरुडसुद्धा विसाव्या-साठी भुईवर टेकेल, नाही असं नाही. पण पंखांना विसावा देत असला तरी डोळ्यांनी मात्र पुढचा प्रवासमार्ग निरखीत असेल. पुढचं उड्डाण जमायचं नाही, करायचं नाही असा ढेपाळून मुळीच बसणार नाही. तसा जर का बसला तर ती क्षणाची धरसोड आणि शाश्वतची वचनमोड यात काहीच भेद नाही. पण हे सगळं मी कशाला बोलतोय ? तुझी मागणी काय ती तरी कळू दे.

सत्यवती : गंगेया, जन्मानं, कर्मानं आणि तू धरलेल्या धर्मानंसुद्धा तू माझ्या विचित्राचा पालक होतास. त्यालासुद्धा या गोष्टीची एवढी जाणीव होती की तो मला कितीऽदा म्हणायचा, 'आई, मला राज्य नको. दादाला देऊन टाक.' तेच ध्यानात ठेवून मी तुला राजा व्हायचा आग्रह केला. तो तू मानला नाहीस. पण राज्याचा भार वहायचं तरी तू टाळणार नाहीस ना ?

भीष्म : कर्तव्यकर्म पार पाडायला हा शांतनव कधीच चुकणार नाही. राज्याचा भार वहायला मी ना म्हणालो नाही. पण उपचारानं राजा होऊन जो मोठेपणा भोगावा लागतो तो मला मुळीच नको आहे.

सत्यवती : आयुष्याच्या उतरणीला लागलेली मी आणि चढणीला लागताच अनाथ झालेल्या अंबिका–अंबालिका... गंगेया, आम्ही तिघीही तशा राजस्त्रिया, पण आता तुझ्या छत्राखालच्या प्रजाच आहोत. नाही का ?

भीष्म : माते, माणसांचे अनुबंध काळानुसार किंवा स्थितीनुसार बदलत नसतात. मी राज्याचा कारभारी असलो तरी तुम्हा तिघींचा मात्र सेवकच आहे.

सत्यवती : गंगेया, तुझ्या धर्मात जर एकच माणूस कोळी आणि माशी दोन्ही होऊ शकतो, तर सेवक आणि धनी एकच असण्यात काय वावगं आहे ? अन् सेवकानंही नुसती सेवाच करू नये, सेवनसुद्धा करावं... [एकदमच] गंगेया, कुरुवंशाच्या सिंहासनाला कुरूंच्या रक्ताचा वारसच नाहीये. देवव्रत भीष्म राज्याचा कारभारी असताना हस्तिनापुरात घरोघरी अष्टपुत्रा सुवासिनी नांदताहेत; आणि राजवाड्यात मात्र नष्टपुत्रा, अदृष्टपुत्रा वनवासिनी स्फुंदताहेत ! अरे डोळ्यात तेल घालून वावरणाऱ्या पहारेकऱ्या, रिकाम्या भांडारावर पहारा ठेवून आहेस तू ! काय उपयोग त्या पहाऱ्याचा आणि त्या पौरुषाचा !

भीष्म : पहारेकऱ्यानं भांडारात काय आहे याचा नसतो विचार करायचा ! तसा तो करायला लागला की डागळलाच !

सत्यवती : घरातला कर्ता पुरुषच गस्त घालीत असतो तेव्हा हे म्हणणं टिकत नसतं ! सेवेकरी दाईला गर्भारशीच्या हवे-नकोची तेवढी काळजी असते. गर्भारशीला मात्र गर्भाचीच चिंता आतून ठोकीत असते. तुला नाही भांडाराचा विचार सोडून चालणार. गंगेया, आम्हा तिघींनाही या घरात आणायला, या ना त्या प्रकारानं तूच कारण झालास. सिंहानं सावजं गाठावीत आणि गुहेतल्या छाव्याला आणून द्यावीत तसा अम्बी–अम्बालींना तू घेऊन आलास. सिंहाच्या सावजाचं एक बरं असतं. त्याची चटणी होते, मेल्यावर. या मानवी सावजांना जितेपणीच किती किती भोगावं लागतं. गंगेया, अंबी–अंबालींचा तुझ्याशी किती प्रकारचा अनुबंध ! त्या तुझ्या पराक्रमाच्या पताका, तुझ्या भावाच्या जाया, तुझ्या प्रतिज्ञेच्या पूजेचं निर्माल्य, तुझ्या सत्तेत वावरणाऱ्या निपुत्रिक विधवा, तुझ्याखेरीज दुसरा कोणताही आधार नसलेल्या अनाथ अबला...गंगेया, मला जो थोडाफार धर्म समजतो त्यानं माझ्या मनाशी हट्टच धरल्यानं तुला विनवते आहे : त्या बिचाऱ्यांना सनाथ कर, या कुरुवंशाला जगता कर, या हस्तिनापुराला पिता दे !

भीष्म : माते, इतक्या परींनी, इतक्या वळणांनी तू मला पुन्हापुन्हा तीच विनवणी करीत आहेस. यावरून स्पष्ट दिसतं की, मी अगदी मनाविरुद्ध काही तरी केलं पाहिजे अशी तुझी इच्छा आहे. मी ती ऐकून घ्यायला

सिद्धच आहे. तेव्हा तू आता सरळच सांग. विचार मनात उद्भवतो तेव्हाच तो भला का बुरा ठरून जातो, त्याच्या उच्चारानं ठरत नाही. म्हणून त्याचा उच्चार करायला संकोचू नको.

सत्यवती : गंगेया, तुम्हा पुरुषांचं बरं असतं. विचार उघडा-नागडा तुम्ही पाहू शकता. आम्ही बायका मर्यादेनं जसे अवयव झाकून घेतो किंवा बाळोत्यातल्या बाळालासुद्धा नटवून खांद्यावर टाकतो, तसंच विचारालासुद्धा मोहक आवरणं आणि उंची आभरणं घातल्यावाचून त्याला मुखाबाहेर काढणं आम्हांला जमतच नाही. आमचं मन पक्कं असतं पण जीभ दुबळी पडते...तरी प्रयत्न करते... [ शब्दांची जुळणी करीत थांबते ]...हे वीर्यशाली गंगेया, काशिराजाच्या कन्या, सत्यवतीच्या सुना आणि विचित्रवीर्याच्या विधवा अंबिका आणि अंबालिका, यांचा हर्ता, धर्ता आणि आता कायमचा पालनकर्ता तूच आहेस. तर त्यांचा देवर म्हणून, तू अवघी एकेक रात्र त्यांचा भर्ता होऊन [ भीष्माची चर्या विलक्षण बदलते ] त्यांच्या ठायी पुत्र आणि कुरूंच्या गादीला वारस निर्माण करावेस !

भीष्म : शिव शिव ! [ विचारात ]

सत्यवती : ही माझी इच्छा, विनंती, आज्ञा– काहीही समज.

भीष्म : मला काही समजत नाही. [ खाली पाहून ] माते सत्यवती धरित्री, तू आपला सद्गंध त्यजिला नाहीस ना ?

सत्यवती : गंगेया, कळतात मला ही बोलणी. पण मी मत्स्यगंधा होते ना ती फाऽर पूर्वी !

भीष्म : माते, का उगाच अपसमज करून घेतेस ? की तुला समजच नाही ? तुझी ही विलक्षण आज्ञा ऐकून मी पंचभूतांना विचारीत होतो की, तुम्ही तर आपापली उपादानं सोडली नाहीत ना ? आपहो, तुमचं वाहतेपण थिजलं नाही ना ? तेजा, तू काळे पडले नाहीस ना ? वायो, तू थांबला नाहीस ना ? आकाशा, तुझा शब्दगुण सरला नाही ना ? नाही, नाही; कारण एरवी अंतःकरणात रुतून बसणारे हे शब्द कुठून आले असते ? तुम्ही जर आपआपली लक्षणं सांभाळून आहात तर माझाच काय अपराध, की मी माझ्या नियत मार्गानं चालत असताना माझी मात्र वाटमारी होते ! शिव शिव !

सत्यवती : गंगेया, जे तुझं मोठेपण तेच तुझं दुबळेपण ! तू आपलं माणूसपण पार विसरून पंचभूतांशी होड लावतोस ! पृथ्वीचा गंध तुला आठवतो पण तिच्या ठोस आधारावर चालणं तुला जमत नाही. पाण्याचं वाहतेपण तुला दिसतं पण ज्या वस्तूचा संग झाला तिचा रंग आपल्या-

वर चढवण्याचं कसब तुझ्यात नाही. तू तेजाचा पुजारी, पण आपल्या तेजानं लोकांचे डोळे दिपवून कार्यभाग साधावा हे तुला साधत नाही. वाहता वायू वाटेल तिथं जाऊन स्वामी होऊन राहतो, तू एवढ्या मोठ्या राज्यात नुसता सेवक होऊन राहिलाहेस. आकाश नुसता शब्द करतं, तू केव्हाच्या एका शब्दानं आपल्या साऱ्या जीवनाला मुकं करून टाकलंयस. मी काय वेडंविद्रं मागितलं, सांग. दिवंगत भावाच्या निपुत्रिक भार्येवर दिराचा अधिकार असतो की नाही, सांग! बरं, मी काय तुला जन्मभर जखडून ठेवतेय? सृष्टिक्रमाचं, राजधर्माचं पालन करण्यासाठी मात्र, तुझ्या व्रतातून वा वचनातून दोन घटका विसावा घ्यायला मी सांगतेय. अगदी वावगं आहे का हे?

भीष्म : माते, पंचभूतांच्या व्यवहारी गुणांवरच आपलं वर्तन ठरवायचं असलं, तर त्यांचा दाखला तरी कशाला द्यायला हवा? आपल्या शरीरात ती विद्यमानच असतात की! मग हे शरीर सांगेल तेच केलं की झालं! पण या शरीरापलीकडे जो कोणी अंतर्यामी आहे त्याचं सांगणं करायचं तर पंचभूतांचेसुद्धा ऊर्जित गुणच घेतले पाहिजेत. तुझ्यामाझ्यात हा मूलभूत भेद आहे, म्हणूनच मला जे नको वाटतं तो तुला धर्म भासतो. धाकट्या दिरानं थोरल्या भावजयीशी संबंध करावा हा धर्म नव्हे,–आपद्धर्म आहे. आणि माझ्यासारखा जो त्याहून उच्च अशा आत्मधर्मानं स्वतःला बांधून घेतो, त्याला आपद्धर्माचं बंधन पडत नाही. माते, तू म्हणतेस ते घडीचं काम मी करू शकत नाही. हा व्रतातला विसावा नव्हे, नासावा होईल. तू अन्य कुणाला सांग.

सत्यवती : अन्य कुणाला? शांतनूंच्या, गंगेच्या आणि सत्यवतीच्या वंशाबाहेरचा कोणी शोधून, कुरुवंशाची भेसळ करायची नाही मला.

भीष्म : माते, पूर्वी परशुरामांनी पृथ्वी निःक्षत्रिय केली. तेव्हा त्या गतिप्रात क्षत्रियांच्या शतावधी स्त्रिया परशुरामांकडे गेल्या आणि वंश चालवण्यासाठी संतती मागू लागल्या. परशुरामांनी आपल्या ब्राह्मण शिष्यांना त्यांची कामना पुरवायला सांगितलं. क्षत्रियांचा फिरून उद्भवच असा ब्राह्मण पुरुषांकरवी झाला असल्यानं, आजही नियोगासाठी ब्राह्मण योग्य मानतात. तेव्हा तूसुद्धा एखादा ब्राह्मण शोधावास.

सत्यवती : आर्यांच्या धर्मधुरीणांनी ही बरी सोय करून ठेवली?

भीष्म : [ हसतो. ] पृथ्वीच्या ठोस आधारावर चालणारी माणसं ती! पण त्यांनीसुद्धा अव्हांटे टाळलेच. सन्मार्गानं चालणाऱ्या ब्राह्मणालाच हे आडवळणी काम करण्याचा अधिकार आहे. घाटावर बसून पंडेगिरी करणारा किंवा या ना त्या मार्गानं टिचभर पोटाची खळगी भरणारा

ब्राह्मण श्राद्धाच्या दिवशी पिंडाचे गोळे गिळायलासुद्धा चालत नाही तर राजवंशाचा अधिकारी उत्पन्न करायला कसा चालेल ? तेव्हा ज्ञान, तप, तेज यांनी युक्त असा सद्‌विप्रच शोधून काढला पाहिजे.

सत्यवती : आपल्याच अभिजात कुळातला शीलसंपन्न राजपुत्र सोडून, अज्ञात कुलशीलाच्या ब्राह्मणांमध्ये चापसणी करावी हे मला अगदीच पटत नाही ! पण तुझ्या जगावेगळ्या हट्टापुढं मी हात टेकले. तूच सांग आता, असा कोणी योग्य ब्राह्मण तुझ्या पहाण्यात आहे का ?

भीष्म : चौकशी करतो. माझ्या मते, तो थोडा दूरदेशचा असला तर अधिक बरं !

सत्यवती : गंगेया, फार विलंब लावू नये हे बरं. पोरींचा ऋतुकाळ जवळ आला आहे. चार-आठ दिवसांत हा नियोगी मिळाला तर चांगलं... [ थांबून ] मी आपलं सुचवते. पहा तुला रुचलं तर. शाक बेटावरचा पाराशर तुला ऐकून माहीत आहे का ? तुला कसा वाटतो ?

भीष्म : एकटाच बेटावर देवीची उपासना करीत राहिला आहे म्हणून द्वैपायनच म्हणतात त्याला. पराशराचा पुत्र आहे. त्याच्या आईची कुणाला माहिती नाही– पण नदीचं मूळ अन् ऋषीचं कूळ शोधू नयेच नाही तरी.

सत्यवती : अस्सं !

भीष्म : म्हणजे माझा काही आक्षेप नाहीऽ. कारण तो, पुत्र पराशराचाच आहे. पण हे देवीउपासक मोठे लहरी असतात. कुणाचं ऐकतील म्हणून भरवसा वाटत नाही.

सत्यवती : मी त्याला लहानपणचा ओळखते. मी जाऊन सांगेन. येईल तो..

भीष्म : नको माते, तू कशाला जायला पाहिजे ?

सत्यवती : [ घाईनं ] काही बिघडत नाही, गंगेया. हा इवलासुद्धा डाग तुझ्यावर नको ! आपल्याआपल्या वेड्या वचनांना आपण सारेच बांधलेले आहोत. गंगेयाला किंवा त्याच्या संततीला शांतनूचं राज्य मिळता कामा नये ही आसुरी इच्छा आरंभापासून आतापर्यंत माझी मलाच पुरी करवू दे. तू जे धर्मविहित म्हणून सांगितलंस तेच करतेय तोवर मनात किंतू यायचंही कारण नाही. मीच जाईन पाराशराकडं. त्याला विनवीन, इकडं यायला लावीन. म्हातारपणी हा जगावेगळा अभिसार करीन ! जा आता. उद्या शाकबेटावर निघायला रथ हवाय मला.

[ पडदा. ]

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ शाक बेटावरची गुहा. तिचा तोंडाचा भाग पार्श्वभूमीवर दिसतो. तिच्यासमोर थोडी जागा साफ करून घेतलेली. बाकी रान वाढलेले. काली नदीनं वेढलेल्या शाक बेटावरच्या या डोंगरगुहेत पराशर मुनीचा पुत्र कृष्ण पहिल्यापासून राहत आला आहे. पाऊलवाटेखेरीज माणसाच्या वावराची दुसरी खूण जवळपास नाही.

सकाळची वेळ आहे. दणकट अंगाचा, विशेष सुभग दर्शन नसलेला पाराशर नदीवरून आंघोळ करून आलेला दिसतो. त्याच्या अंगावर मातीचा काळपट लेप. जटाभार मोकळा सोडलेला. खांद्यावर ओल्या पंचाचा पिळा. हातात पाण्यानं भरलेला कमंडलू. डोळे गुंगीत असल्यासारखे तांबारलेले. चालणं झटक्याचं पण तंद्रीतलं. इतर कुठं लक्ष नसल्यासारखं.

पाराशर गुहेपाशी परत आल्यावर पंचा वाळत घालतो. कमंडलू खाली ठेवून गुहेत जातो. आतून आवाज येतो. तो त्याच्या पायाचा धक्का लागून घरंगळलेल्या वरवंट्याचा असतो. तो उचलून पाट्यावर ठेवल्याचा आवाज मागाहून येतो.

एक आसन, एका पात्रात पूजेचं साहित्य आणि एका हातात लहानशी भरलेली घागर घेऊन पाराशर बाहेर येतो.

पाराशर : नमो नमो देवी काली । [ आसन खाली टाकतो. ]
नमो नमो जगत्पाली ॥ [ पात्र खाली ठेवतो. ]
शिवशक्तिरूपे व्याली । [ घागर खाली ठेवतो. ]
अवघ्या विश्वरूपा आली ॥ [ चहूबार नजर फिरवतो. ]

नमो नमो देवी काली ॥ [ आसनावर बसतो. ]

नमो नमो देवीऽ कालीऽ : [ कमंडलू हातात घेऊन त्याच्या आत

पहातो. ] देवी काली, अपार आणि अथांग अशा पात्रातही न मावणारी तू या पोकळ भोपळ्याच्या पोटातसुद्धा पूर्णांशानं समावतेस ना! तू आदिशक्तीचंच रूप आहेस याची आणखी साक्ष ती काय हवी? तिच्यासारखी तूही चराचराचं पालनपोषण करतेस आणि खवळलीस की त्या साऱ्यांना प्रलयाचा अनुभव देऊन गिळून टाकतेस...प्रलयानंतरच्या त्या उजाड स्मशानात हिरवं जीवनही उभं करतेस. उगाच नाही गुरूंनी देवीस्वरूपात कालीची आणि काली-स्वरूपात देवीची उपासना करायचा बीजमंत्र दिला! गुरू पिता, गुरू देवता. इथं पिताच माझा गुरू म्हणून मी दुप्पट भाग्याचा. आणि माता? माता– काली! [ पालथ्या हाताकडे पाहतो. ] या माझ्या अंगासारखीच काळी...कधी संथ–हसणारी, कधी रुद्र–रुसणारी, कधी कराल–गिळणारी! पण सुखदुःख, काळेगोरे, निर्मळ-घाण, सारी तुझीच रूपं. म्हणून तर परवा इथं आल्यावर गुरूंनी सांगितलं– 'कृष्णा, आता या भेदांच्या वर जा. घाण अमंगळ काही नाही याची जाण घे. बघ ती माता काली: काल-स्वरूपात साऱ्याचा संहार करून स्मशानातल्या अस्थिचर्मावर नाही का भूक भागवीत? नररुण्डांच्या माला नाही का धारण करीत?' त्यांनीच मग सांगितलं म्हणून [ कमंडलूकडं पहात ] देवी काली, तुझ्या तटावरच्या जुनाट अश्वत्थाखाली, कुजल्या-सडल्या गाळानं भरलेल्या डोहात मातीचा लेप अंगाला लावून येतो; आंघोळ झाल्यावर...चंदनाच्या उटीसारखा. आंघोळ करतो ती तुझ्या अमृतधारेत निर्मळाचा लेप लावून घेण्यासाठी. नंतर हा मळाचा लेप लावतो तो त्या निर्मळाला अंगाशी लपटून ठेवण्यासाठी. ऐं ओं... [ कमंडलूच्या पाण्याचं आचमन करतो. ] भले पाराशर! विसरूनच चालला होतात की! भगवती काली, गुरुदेवता पिताश्रींनी [ स्वतःकडे पहात ] या मातीच्या डंड्याची पाठ पण थोपटली. म्हणाले, 'आता तू पशूकोटीतून वीरकोटीच्या साधकात आलास. पाची मकारांची महा-साधना करायला मुक्त झालास. जीवाला भावणाऱ्या भेदभावांचं भान हरवणाऱ्या दिव्यौषधीचं पान करायला युक्त झालास!' [ घागरीकडं पाहतो. ] पहा, त्यांनी सांगितल्या त्या साऱ्या औषधी आणल्या, व्यामोह-वासना ठेचून काढाव्या तशा त्या वरवंट्यानं ठेचल्या... आणि या कुडीत तू आदिशक्ती समावावीस तशी या घटात ती दिव्य धारा भरून ठेवली, आज ती प्राशन करायची म्हणून. विधिपूर्वक व्हायला हवं सारं. [ ध्यान-पूजन-विधी करता करताच बोलत जातो ] हा त्रिकोण! विश्वाला जन्म देणाऱ्या शक्तीचं प्रतीक! त्यात हा बिंदू!

शक्तीच्या प्राणतत्त्व शिवाचा अवतार ! हा सबिंदु त्रिकोण आधाराला असल्यावर पूजासनाला कसली ढळ बसणार ? या अक्षत शालींच्या लाह्या – ही तर मुद्रा : उरलेल्या चार मकारांवर अधिकारांचा ठसा उठवते जणू. पाराशर, आता पशुकोटीतून वीरकोटीत आला आहात. आता अमक्यावर तमक्याची कल्पना करून साधना करायला नको म्हटलं ! आता लाह्या म्हणून तांदुळाचा अनुकल्प नको किंवा वांगी-रताळी धशाखाली उतरवून मासा गिळंकृत केला असं मानायला नको. साधना उन्नत करणारी खरी. पण [ चोरट्यासारखा आसपास पाहून घेतो ] एकटाच आहे तेव्हा बोलायला हरकत नाही – तिच्यातल्या काही भागांचा कंटाळा येतोच बरं का ! हे अनुकल्पाचं प्रकरणच बघा ना ! वानरांनी आमच्या अंगावर शहाळी फेकायची, ती घाम फुटेतोवर सोलून मग आम्ही त्यालं तुरट पाणी प्यायचं आणि कल्पना करायची की आपण विजयेचं पान करतोय म्हणून ! हे म्हणजे फारच झालं हां. आता विजेयचीच चव नेमकी कशी असते किंवा ती घेतल्यानं नेमकी कसली तंद्री लागते हे मला अजून माहीत नसलं... तरी तिच्या घटकांवरून काही कल्पना येतेच की. काय त्या एकेक वनस्पती अन् काय ती एकेक द्रव्यं ! कालीच्या हरितमंदिरातल्या साऱ्या देवता जणू साधकाला गुंगवून टाकण्यासाठी स्वर्गातून पृथ्वीवर आणि पृथ्वी-वरून या पाण्यात प्रवेश करतात असा भास होतो. म्हणून तर या विजयेशी मर्यादेनं वागायचं असतं. पिताश्री म्हणाले होते, प्रभात-साधना संपल्यावर कमंडलूतल्या एक भाग पाण्यात तीन भाग ही विजया – की तीन भाग पाण्यात एक भाग ही विजया; अशी ती घेतली म्हणजे खरी आपल्याला सुखाच्या सिंहासनावर चढवते. [ घागरीकडं आशाळभूतपणं पाहतो. ] हे घटा, ब्रह्मांडात हे विश्व नव्हतं तेव्हा आदिशक्तीनं जसा तो एक हुंकार भरला, तसाच नाद तू आकाशाकरवी करवतोस आणि म्हणून आम्हा नादवेड्या शाक्तांना तू प्रिय असतोस. प्राणाचा एकेक झंकार एकेका अक्षरातून उमटतो म्हणून आम्ही अक्षरांनाच देवतास्वरूप देत असतो ना ! त्यामुळं तूही मला ध्वनिसाधना करणारा शाक्तच वाटतोस. कालपर्यंत पाण्यानं भरत असलेला तूही आता विजया भरून घेऊन वीरकोटीत आला आहेस वाटतं ! तेव्हा हे धन्य धन्य घटपुरुषा, तुझ्या जोडीनं मलाही ती प्राशिता आली तर कसा अपूर्व योग ! मग त्यासाठी ध्यानपूजन सरेतोवर थांबलं पाहिजेच का ? [ पात्रात घागरीतली विजया ओततो. ] एक भाग पाणी आणि तीन भाग विजया, की एक भाग विजया

आणि तीन भाग पाणी – [ विचारात ] किंवा आजच्या अपूर्व दिवशी एक भाग विजया आणि तीन भागही विजयाच घ्यावी! बरा प्रश्न सुटला. [ पात्रात आणखी विजयाच ओततो. ] काय रंग आहे! पावसाळ्यात रंगलेल्या कालीच्या प्रवाहासारखा! ऐं ओं अमृत-वर्षिणी... [ पात्र तोंडाला लावतो. तोंड थोडे वेडेवाकडे करीत पात्र खाली ठेवतो. ] चव मात्र विलक्षण हां! आजवर कधी घेतली नाही असली. नेमकी कशी ते कळत नाही; पण पुन्हा घ्यावीशी वाटते. [ पात्र उचलून तोंडाला लावतो ] वा ऽ वा ऽ! अडाणी लोक म्हणोत तिला भांग – आम्ही शाक्तांनी दिलेलंच नाव खरं सार्थ आहे – विजया! मेरुदंडात कुंडलिनीला ध्वजदंडासारखी ताठ करणारी औषधी! साऱ्या आतबाहेर आपल्याला स्वामी करून टाकणारी द्रवदेवता! आ हा हा... शरीरातला कण न् कण नाचायला लावणारी ही वीज! या मनुष्यरूपी मृदंगातून, न ऐकलेले ध्वनी काढणारी ताली! ध्वनीतून अक्षर, अक्षरातून मंत्र, मंत्रातून साक्षात् प्रकटणारी शक्ती, कालीऽ. [ दुरून क्री ऽ ऽ असा हाकेचा आवाज, स्त्रीच्या तोंडचा ऐकू येतो. आणि झट्कन खंडित होतो. ] काय? अंतरिक्षातून 'क्रीं' ध्वनी आला? क्रीं... क्रीं...! क्रीं हे कालीवाचक मंत्राक्षर? कालीचे ध्वनिरूप क्रीं दाही दिशांनी माझ्यावर गर्जत आले? एवढ्याशा विजया प्राशनाचा हा चमत्कार? अयि ओं अमृतदायिनि। [ पुन्हा पात्र तोंडाला लावतो; उठतो. आता पाय किंचित थरथरतात. ] आता मी सिद्ध! मी स्वामी. मी शाक्त! एका मकाराच्या दहा-पाच घोटात एवढी शक्ती– पाची मकारांच्या घोटीव साधनेत किती असेल! छे छे, मला वाटतं या इथं ह्या त्रिकोण चौकोनी आकृत्यांवर साधना करीत बसण्यापेक्षा त्या पंचकोनी पात्र्यावर गोलस्या वरवंट्यानं या विजयेचीच आराधना करावी! [ घागर आणि पात्र उचलून घेऊन गुहेत निघून जातो. पडदा पडतो. त्याच्या पार्श्वभूमीवर शाक बेटावरच्या पाउलवाटेनं चाललेली सत्यवती दिसते. ]

**सत्यवती** : सऽगळं पहिल्यासारखं. पंचवीस वर्स गेली, काऽही बदललं नाही. रथ सोडला अन् काठाची नाव पाण्याला लावली ती जागासुद्धा तशीच होती. मग काय! मीसुद्धा पहिल्यासारखी झाले. निम्मं औक्ष कालीला वाहून टाकलं अन् तरणी झाले. नावंतसुद्धा कुणाला येऊन नाही दिलं. 'माताजी, माताजी, एकस्या कशा जाता' करायला लागले. दटावलं थोडंसं, मग बसले सारे उगी. मनात म्हणलं, 'बाप्याहो, नाव काय मला नवीन हाये का.' अन् पहिल्यासारखीच वल्ही मारली.

वेटाला लागल्ये तर तीसुद्धा जागा वळखीची, वरीसभर तिथं जायचे ना धुणंपाणी करायला. क्रिष्णाला कधीकधी घरीच ठिवून जायचे. परत येतानि मनाला चाळा, जिभंला चाळा- "क्रीऽऽष्णा" करून हाक मारायचा. आज तीच आठवण झाली अन् गेले हाक मारायला. क्रीऽऽ म्हणस्तंवर काटा मोडला पायात. कळून चुकलं की कोळवाड्यातली काली राजवाड्यातली राणी झाली अन् नाजुक नार होऊन पडली. एवढुसा काटा टोचला तर मान मोडल्यागत आवाज बंद पडला. म्हणलं, 'काले, गप वाटंनं चाल बया, तुला मऽस तरणं वाटतंय्, पण तरणी नाहीस आता तू. नायतर पुन्हा कशाला आली असतीस इथं?' बऽरं बाई सत्यवती बघून घे, मनात ठेव, अन् वाटलंच कधी तर कर आठव!

[ सत्यवती मंचावरून जाते आणि पडदा वर जातो. पुन्हा पाराशराची गुहा दिसते. सत्यवती भारावल्या पावलांनी जवळ येत असते. बाहेरच्या बाजूला पडलेलं पूजासाहित्य पाहून तिला हुरूप येतो. ती चाहूल घेत इकडंतिकडं पाहते. त्याच वेळी आठवणींचं ओझं मनावर येतं. नेमकं काय बोलावं याचा विचार करीत ती थोडा वेळ थांबते. ]

सत्यवती : अवो, अरे, आत आहेत काय? मी,–अवोऽ [ आतून उत्तर येत नाही. पुन्हा हाकारते. ] आत आहे का कुणी?

[ आतून पाराशराचा जड आणि तुटक आवाज येतो. त्याच्यावर विजयेचा परिणाम झालेला. ]

पाराशर : [ आतून ] कोऽऽण?

सत्यवती : मी–

पाराशर : ते समजलं! मी कोण?

सत्यवती : मी काली.

पाराशर : तू काली? खरे?

सत्यवती : अगदी खरं–मी काली!

पाराशर : धन्य धन्य विजये! अजून कंठापर्यंतसुद्धा आली नाहीस तर प्रत्यक्ष काली माझ्यापर्यंत आणलीस! आणखी थोडा प्रसाद दे! [ प्याल्यानंतर भांडे धपूकन जमिनीवर आल्याचा आवाज येतो. ] तू माता काली?

सत्यवती : होय, तुझी माता. [ गहिवरून ] कसं ओळखलंस रे माझ्या बाळा...!

पाराशर : माझी माता काली? ती इथे आली? ही ना जागृती, ना सुषुप्ती, ना हे स्वप्न आहे! अरे ही तुरीयावस्था आहे! माते काली, हा मी आलो! तुझं साक्षात दर्शन इतक्या झपाट्यानं घडवणाऱ्या या विजयेच्या घड्यासह आलो!

[ बाहेर येतो. हातात घडा. डोळे लाल. चेहरा उग्र. अंगावरचं चिखली रोगण तसंच. उन्मादल्यासारखा बाहेर येतो. सत्यवतीला पाहून थबकतो. तिच्याकडं अविश्वासानं पाहतो. सत्यवती अमित मायेनं त्याच्याकडे पाहायचं करते. पण त्याच्या या भयानक दर्शनानं हबकते. ]

सत्यवती : [ आवेगानं ] काय रे तुझी दशा बाळा !

पाराशर : मला बाळा म्हणणारी तू कोण ?

सत्यवती : ओळख विसरलास ? आत्ताच ना म्हणालास आई काली आली म्हणून ?

पाराशर : तू आई काली ? विश्वातल्या चित्रविचित्रांची जननी तू ?

सत्यवती : होय, चित्राविचित्रांची माता मीच !

पाराशर : अशक्य ! अनादिसत्यवती काली तू कशी असशील ?

सत्यवती : बाळा, सत्यवती पण मीच आहे.

पाराशर : अन् हे बघ, मला पुन्हापुन्हा बाळा म्हणू नकोस.

सत्यवती : असा रे का म्हणतोस ! तुझी जन्मदाती आई ना मी !

पाराशर : छट् ! मला फक्त वडील माहीत आहेत. अन् त्यांनी मला सांगितलंय– तुझी आई काली. या नश्वर शरीराला जन्म देणारी आई तर नाहीशी झाली.

सत्यवती : नाही नाही कृष्णा–

पाराशर : काय म्हणालीस, कृष्णा ? मला हाक मारलीस ?

सत्यवती : होय, तुला.

पाराशर : मग तुला कसली तरी सिद्धी असली पाहिजे. त्याशिवाय माझं नाव तुला माहिती व्हायचं नाही. इथं माणसं कुणी येत नाहीत. म्हणजे तू कालीच्या भूतगणांपैकी कुणी दिसतेस.

सत्यवती : तसंच पाहिलं तर तुझ्या आई कालीचं मी भूतच आहे समज.

पाराशर : अरेच्या ! मी आपलं काहीही म्हटलं की ते स्वतःलाच चिकटवून घेतेयस तू ! बरीच दिसतेस. ही विजया घेऊन मला काही भ्रमबीम झालायसं वाटतं की काय तुला ? [ घडा खाली ठेवतो. ]

सत्यवती : नाही रे क्रिष्णा– सत्य हेच असं भ्रमवणारं असतं. बाळा, तू मोठा सिद्ध झालायस म्हणतात– पण मी तुझी रक्ताची आई आहे हे सत्य तुला अजून जाणवतंय का ? माझी ओळख पटतेय का !

पाराशर : आलीस पुन्हा मूळपदावर. असंच काहीबाही सांगून माझ्या या ध्यान-गुहेतून मला बाहेर काढलंस. अन् ओळख जाणवायचं म्हणशील तर

आम्ही रोख-ठोक पंथाचे लोक. उद्या प्रत्यक्ष देवी आली तरी म्हणू : ओळखीची खूण सांग.

सत्यवती : खूण ? अरे क्रिष्णा, साऱ्या खुणाचखुणा पसरल्यायत इथं ! कोणत्य म्हणून सांगू ? अन् एक वर्षाचा लोळागोळा होतास तेव्हाच लावलं मला इथून– तुला काय आठवणार रे खुणा ? पण आता मोठा झालायस. आता कळतील. ऐक. एकच खूण सांगते. ही गुह पराशरांची ना ?

पाराशर : होय.

सत्यवती : ते पराशर, तू पाराशर, आणि तुझी– क्रिष्णाची आई, या तिघांखेरीज सातवं पाऊल तिच्या आत पडलं नाही ना ?

पाराशर : नाही.

सत्यवती : मग या काळोख्या गुहेच्या कोपऱ्यातली खूण सांगते ऐक. या काळ्या खडकाच्या गुहेत पांढऱ्या खड्याच्या दगडाचा एक कोनाडा आहे का ?

पाराशर : पुढं बोल.

सत्यवती : त्यात एक दगडीच कुइरी आहे.

पाराशर : [ओरडतोच] सांग तिला कसला वास येतो !

सत्यवती : [स्वतःला विसरते] वाऽस ! ज्या वासाला भाळले, ज्या वासानं चळले – ज्या वासामुळं, माझ्या क्रिष्णा, तुझी आई झाल्ये... [त्याच्याकडं धावते]

पाराशर : दूऽऽर ! दुरून बोल. अजून ओळख पटायची आहे.

सत्यवती : [सावरते.] क्रिष्णा, तुझ्या पित्यानं मला धर्मतरीत पाह्यलं– मी नाव चालवायचे, माझ्या पित्याच्या घरी– तर, त्यांनी मला पाह्यलं. तेव्हा, रंग सावळा होता तरी रूप आगळं होतं माझं ! शरीर रसरशीत होतं– ते तुझ्या नेमधर्मी पित्यालाही भुलवीत होतं– पण त्याला मासळीचा वास होता आणि तो वास तेवढा मधे नाश करीत होता. तेव्हा तुझा पिता म्हणाला, 'ही घे औषधी, हिमालयातून आणली आहे, लाव अंगाला अन् दरवळू दे तुझाच सुगंध. हो गंधवती, चल.' क्रिष्णा, सांग : त्या कुइरीला न् कोनाड्याला त्या औषधीचा– अरे कस्तुरीचा– वास येतो की नाही ?

पाराशर : तू माझी आई असावीस याची खूण पटली.– ओळख नाही !

सत्यवती : म्हणजे काय ?

पाराशर : म्हणजे तेच. एक वर्षाच्या मुलाला गुहेत टाकून जाणारी स्त्री, कस्तुरीचा लेप फासून आली तरी मला तिची घाणच येत राहील.

सत्यवती : क्रिष्णा, नको रे असा बोलू! मुलं वाईट निघतील, आई नसते कधी वाईट!

पाराशर : साफ खोटं. मूलच नसतं कधी वाईट बरं! आई गर्भ धारण करते तेव्हा तिच्या मनात वासना असेल, पापपुण्य असेल. त्या बापड्या गर्भाला फक्त असणं माहीत असतं; तो शुद्ध असतो, पवित्र असतो. मत्स्यगन्धे, पाप पुण्य हेतू इच्छा या साऱ्यांच्या पार असलेली फक्त एक माता असते– ती जगन्माता. बोल, का गेलीस मला टाकून?

सत्यवती : गेल्ये नाही. मला जायला लावलं– तुझ्या बापानं. मला काऽही कळत नव्हतं. माझी धर्मतरी तीराला लागली अन् आयुष्याची नाव वावटळीत सापडली! कडक नेमधर्माच्या कोरड्या दिनचर्येत त्याला थोडा रुचिपालट हवा झाला म्हणून त्यानं माझ्या कुशीत तुला जन्म दिला. पुढं काय वाटलं, माझं लोढणं त्याला नको झालं. जगभर हिंडायचं म्हणून माझ्यासवे संसार मांडायची तयारी नव्हती त्याची. आपला वंश चालता रहावा म्हणून तू मात्र त्याला हवा होतास. पाप असलंच तर ते तुझ्या–

पाराशर : थांब; पुढचा शब्द काढू नको. परिणाम वाईट होईल.

सत्यवती : नाही काढीत. रक्ताच्या ओढीनं तुझ्याकडं आल्ये आहे ती धारदार शब्दानं तोडीत नाही.

पाराशर : कशाला आलीस? पंचवीस वर्षांत मेलो का जगलो याची चौकशी केली नाहीस– चांगली वैभवात दिसतेस– आताच कशी आठवण झाली माझी?

सत्यवती : बाळा, आठवण मुक्या माणसाच्या विचारासारखी असते. अनावर झाली म्हणजे घशातून अं अं करीत बाहेर पडते. ऐकणाराला समजत नाही, बोलणाराला समजावता येत नाही! आई म्हणून तुझी आठवण नेहमीच अंतरी वागवीत होत्ये; बाई म्हणून बाहेर मात्र वेगळं वागावं लागत होतं. धारेला लागलेली नाव वहातच गेली.

पाराशर : काय झालं? कुठं वहात गेलीस?

सत्यवती : तुम्ही साधक लोक एकाच एका मार्गानं जगायला बघता. आम्ही साधी माणसं बारा वाटांनी धावतो. कस्तुरीचा गंध संगे घेऊन पण पोटचा पोर मागं ठेवून इथून गेल्ये – हस्तिनापूरच्या राजाची हट्टी राणी झाल्ये, आणि दोन राजपुत्रांची रडकी आई झाल्ये; आणि अखेर दोन विधवा सुनांची विधवा सासू म्हणून उरल्ये. नाव ज्या भोवऱ्यातून निघाली होती त्याच भोवऱ्यात परतून आली!

पाराशर : ते तर दिसलंच. पण मग माझ्याकडं कशाला? त्या भोवऱ्यात मला ओढून काय मिळणार तुला?

सत्यवती : पदर पसरून तुला मागत्ये ते देशील? तुझ्या मातेची इच्छा पुरी करशील?

पाराशर : इच्छा पुरवीत असतो केवळ एका मातेची. .इतरांच्या इच्छा– तिच्या इच्छेला पूरक असल्या तरच!

सत्यवती : पाराशरा, हस्तिनापुराचं राज्य मोठं मानाचं आहे.

पाराशर : स्वानंदसाम्राज्यापुढं कवडीमोल– मला नको.

सत्यवती : मी राज्य द्यायला नाही आल्ये. राज्याला राजा नाही कारण, माझ्या सुनांना पुत्र नाही...

पाराशर : मी आता कुणाचाच पुत्र उरलेला नाही. तू माता ठाऊक नव्हतीस ती भेटलीस. आणखी मातांची गरज नाही.

सत्यवती : माझा वंश खंडित होऊ नये म्हणून तुझ्याकडं, माझ्या वंशाच्या अंकुराकडं आल्ये.

पाराशर : प्रपंचाचं अरण्य अंकुरातून पोसायला? मला, शक्तीची भक्ती सोडून सक्तीची भुक्ती घे सांगायला?

सत्यवती : काय वावगं आहे त्या भुक्तीत? अरे, देवी ब्रह्मांड प्रसवली म्हणता, मग त्यातले वंश जगवणाऱ्या, या घरोघरी प्रसवणाऱ्या देवींनाच का नावं ठेवता?

पाराशर : कारण, या एका जन्मात आम्हांला हा जन्ममरणाचा सोहळा कायमचा थांबवायचा असतो– निदान आमच्यापुरता.

सत्यवती : पाराशरा, माझं मागणं फार नाही. मुक्तीचा सोहळाही तुला फार काळ नाही करावा लागणार. लग्नानंतरचा मुलगा देऊ शकला नाही ते लग्नाआधीच्या मुलानं द्यावं म्हणून इथवर आले. गारेच्या चिपळीनं तुझी नाळ तोडून माझ्या रक्ताची वहाळ दुसऱ्या जीवात झरायची थांबवली होती. ती तुझ्या पौरुषानं पुढं झरत रहावी, म्हणून धारेच्या उलट नाव घेऊन आले.

पाराशर : राणी झालीस तरी नाव चालवायचा तुझा छंद सुटत नाही.

सत्यवती : खरंच रे खरंच! राणी झाले म्हणूनच. माझं नाव चालू राहिलंच पाहिजे असं वाटतं. जगानं म्हणावं, वंश जगतोय कालीचा, सत्यवतीचा; गंगेचा नव्हे. गंगा तुला माहीत नसेल. मीही पाहिली नाही. पण ती माझी थोरली सवत होती. तिचा मुलगाच माझ्याहून मोठा. तो राज्य चालवतोय. पण माझ्या लग्नातच शपथ घेतलीय त्यानं ब्रह्मचारी व्रताची! म्हणून तुला बोलवायला आल्ये नियोगासाठी.

पाराशर : पित्यानं तयार केलं योगासाठी, माता बोलावते नियोगासाठी ! काय कामगिरी एकेक ! अन् माते, तुला काय वाटलं, मी येईन ?

सत्यवती : आशा वेडी असते ! जाळ्यात पाणी पकडायला बघते.

पाराशर : आशेला नाही जमायचं ते. देवीनं दिलेल्या एखाद्या सिद्धीला जमेल, जमलं तर. [ पूजासनाकडं लक्ष जातं. ] जा. फार वेळ घेतलास. मायावी बोलत बसलीस. माझी साधना राहून गेली. [ घागर दृष्टीस पडते. ] आणि आजच प्रथम चाखलेली ही वल्ली पण विसरून गेलो ! पंच मकारातली आपोदेवी– विजया ! मद्य-मत्स्य-मुद्रा-मांस... म म मै... [ ताड्कन सत्यवतीकडं बघतो ] माते...

सत्यवती : क्रिष्णा–

पाराशर : माते मी म्हटलं ना, ते सिद्धीचं काम ! सुटला तुझा प्रश्न– [ विजयेचा घटच तोंडाला लावतो. ]

सत्यवती : खरंच ? म्हटलं ना, आशेला मरण नाही ! बोल ! कितीऽरे पितोस !

पाराशर : [ जडावल्या जिभेनं ] तिचेच आभार मान ! ऐक, आमच्या पाच मकारांपैकी चारांची व्यवस्था आमची आम्ही करतो; करतो ना ? पण पाचवा मकार आहे ना– त्यासाठी मात्र... कोण लागते ?... परस्त्री. समजलीस ? जिथं आसक्ती शून्य आहे अशा ठायी, शिवशक्तीचं मीलन घडवून आणतो आम्ही. कसं ? मैथुनानं... बरी आयतीच आवंतणं घेऊन आलीस. जा आता. सांग तुझ्या सुनांना... चार महिने व्रती रहा. शिवस्वरूप यती येणार आहे म्हणावं तुम्हाला भोग द्यायला !

सत्यवती : चार महिने ? नको रे बाबा ! ह्या पावली नेते तुला.

पाराशर : असा ऽ येऊ ? [ पुन्हा घडा तोंडाला लावतो. ] ए ऽ तुझ्या सुनांना याचा [ घडा खस्कन तिच्या तोंडाकडं नेतो. ती मागं सरते. तोंड वाकडं करते. ] अन् माझा ऽ वास येईल ना ! अन् हे डोळे पाहिलेस ? [ बुबुळं फिरवतो. सत्यवती भीतीनं चमकते. ] हे केस ? [ जटा भेसुरपणं तोंडावर घेतो. ] चालेऽल हे सारं त्यांना ?

सत्यवती : चालेल, चालेल ! अंधारात काय कळणारय् ?

पाराशर : [ ओरडतो. ] नाऽऽही ! अंधारात नाही चालणार ! लख्लखाट हवा– शिवशक्तीचं मीलनाय् ते ! जा. एक वाटाड्या ठेव. चार दिवसांनी येतो मी... ऐं ओं अमृतवर्षिणि... [ घडा तोंडाला लावतो. ]

[ पडदा ]

## अंक दुसरा
### प्रवेश दुसरा

[ सत्यवतीची विधवा सून अंबिका दुपारच्या वेळेला आपल्या खोलीत शिरत आहे; तिचे केस लांब, ओलसर, मोकळे. वयानं विशीतली. अकाली पतिनिधनानं ओढलेली दिसते. ]

अंबिका : [ केस पुसताना मंद आवाजात ] काशी, चल ग. येतेस ना केस विंचरायला? [ वाट पहाते. काशी येत नाही. ] गेली वाटतं एवढ्यात कुठं! काशी– जाऊ देत. केस विंचरून तरी काय? आपलेच पालथे हात लागायचे ना त्यांना.
[ एवढ्यात सत्यवती आत शिरते. शिरतानाच बोलते. ]

सत्यवती : काशीला का बोलवत होतीस? मीच पाठवली तिला.
[ अंबिका दचकते. ]

अंबिका : माताजी, तुम्ही!... [ नमस्कार करायला पुढं होते, पण तशीच घोटाळते. केस सावरते. ]

सत्यवती : केसच ना विंचरायचेत? मी विंचरते चल.

अंबिका : तुम्ही कशाला? मी विंचरते. विंचरून तरी काऽय!

सत्यवती : असं नाही बोलू. मला विंचरू दे. देवीनं मुलगी नाही दिली मला...
[ अंबिकाच या बोलण्यानं भरून येते. ]

अंबिका : नका माताजी असं बोलू... [ पुढं होऊन फणी घेते. सत्यवतीही आरसा घेते. दोघी जमिनीवर बसतात. सत्यवती तिचे केस विंचरू लागते. ]

सत्यवती : काय ग मान निघालीय तुझी! केससुद्धा एकेक निघून येतोय फणी-बरोबर! [ अंबिकेचा हात कानाशी येतो. ] हाताला तर मास नसल्या-गत झालंय. अम्बी, असं झिजू नाही बाळ माणसानी. [ अंबिका सुस्कारा टाकते. थोडा वेळ शांततेत जातो. सत्यवती मागं केस बांधायला लागते. डाव्या हातानं अंबिकेला आरसा देते. अंबिका त्यात पाहिल्या न पाहिल्यासारखं करून तो खाली ठेवते. ]

सत्यवती : [ केस बांधायचं संपवतांना ] बघ बरं, विंचरलेत का काशीसारखे ?
अंबिका : माताजी, कधी नाही ते तुमचे हात लागले. केसात ते काय बघायचं ?
सत्यवती : अम्बी, इतकंऽऽ कोंडून राहू नाही माणसानी. [ आरसा तिच्या हातात कोंबते. ] बघ.
[ अंबिकेची नजर आरशाकडं जाते. तिचा चेहरा जरा चौकस होतो. बारीक बघण्यासाठी ती आरसा तोंडाजवळ आणते. चेहरा विलक्षण बदलतो. आरसा खाली येतो. ती आर्तपणं पण दुबळ्या आवाजात ओरडते. ]
अंबिका : माताजी... [ शब्द फुटत नाही. ]
सत्यवती : काय ग ?
अंबिका : माताजी, तुम्ही भांग पाडलात ! माताजी– [ विव्हळून हुंदके देते. ]
सत्यवती : अम्बी, अग झालं तरी काय ? [ तिचं तोंड आपल्याकडं फिरवून घेते ] डोळे पूस बाळ. कशाचा धसका घेतलास एवढा ?
अंबिका : माताजी, बघा ना... तुम्ही भांग पाडलात. कसा हो ! [ पुन्हा रडते.]
सत्यवती : भांग पडला म्हणूऽन होय ?
अंबिका : माताजी, तो विसकटला तो कायमचाच ! या केसांचं भाग्य कुठंय भांगाचं ! [ आपलेच केस ओढते. ]
सत्यवती : अग अम्बी–
अंबिका : माताजी ऽ भांगाचे धनी गेले नाऽ !
सत्यवती : [ डोळे टिपते ] उगी, उगी अंबीऽ–
अंबिका : उगीच बसायचंय जन्मभर आता. भांग मोडा तेवढा !
सत्यवती : मोडते बाई. पुन्हा विंचरते केस तुझे. [ तिची आसवं पुसते. ]
अंबिका : [ क्षीण आवाजात ] राहुद्या माताजी. हे केसच निकामी, तिथं भांगाची काय कथा ! कोण बघणारय् ? आरशात पाहिलं नसतं तर मला तरी काय कळलं असतं ? तुमच्या हातानं बांधले, तसेच राहू द्या.
सत्यवती : [ तिच्या तोंडावरून हात फिरवते आणि कानशिलावर बोटं मोडते. ] शहाणी माझी बाई ! विचित्रा म्हणायचा, ' आई, माझ्यामागं अंबीचा संभाळ कर ! ' अम्बी,
अंबिका : काय म्हणता माताजी ?
सत्यवती : अंबी, माझ्या गोवऱ्या तर घाटावर जाऊन पडल्यात–
अंबिका : कसं बोलता माताजी !
सत्यवती : आता कशाचा अडसर धरायचा अंबी ? या कुरुवंशातल्या तीन चिता धडधडल्या माझ्यासमोर. आता माझी पाळी !

अंबिका : माताजी ऽऽ!
सत्यवती : तू नको भेदरूस अम्बी. हा सारा वंशच पेटलाय. आपल्यासुद्धा आहुत्या त्यात पडणार. अन् मग ? मग आपण सारी नरकात खितपणार. श्राद्धाचं पाणी तरी कोण सोडणारयू आपल्यासाठी ?
अंबिका : आम्ही दोघी असून वांझोट्या. एवढासुद्धा हातभार लागला नाही या वंशाला ! महाराजांच्या जागी मला का नाही नेलं हो देवानं ?
सत्यवती : त्याचा तो गेला, अम्बी. मी म्हातारी निकामी. तुम्ही तरण्याताठ्या. अजून आशा तरी आहे !
अंबिका : जिवंतपणी नरकाची !
सत्यवती : नाही अम्बी !– मी तुला विचारायलाच आले होते– तू ही अशी हळवी–पण आता आडपडदा नको असं वाटतं...
अंबिका : मुळीच आडपडदा नको माताजी. उघड्यावर पडल्यांनी पडदा कसला पाळायचा !
सत्यवती : अम्बीऽ, मी युवराजाला पण विचारलं.
अंबिका : गंगेयांना ?
सत्यवती : हो.
अंबिका : काय म्हणाले ते ?
सत्यवती : म्हणाला, वंशाला वारस हवाच. अन् वारस हवा तर शास्त्रानं सांगितलेला एक प्रशस्त मार्ग आहे.
अंबिका : प्रशस्त ?
सत्यवती : शास्त्रानं सांगितला म्हणजे प्रशस्तच नाही का ?...कोणता तो नाही विचारलास.
अंबिका : त्यात काय विचारायचं ? पांगळ्यानं प्रवासाची वाट पुसून काय करायचंच ?
सत्यवती : पांगळ्यानं बसावं आंधळ्याच्या खांद्यावर. वाट ध्यावी समजून अन् सांगावी त्याला. बरं, ते जाऊ दे. गंगेय म्हणाला, ' माते, पूर्वी पृथ्वी निःक्षत्रिय झाली. तेव्हा क्षत्रियांच्या स्त्रियांनी, ब्राह्मणांकडून– '
अंबिका : [ धक्का बसल्यासारखी बोलते ] माताजी ऽ
सत्यवती : म्हणजे इतक्यापर्यंत लोक जातात ग ! आपण थोर घराण्यातल्या माणसांनी–
अंबिका : घराण्याला शोभेलसं नको का वागायला ? महाराज गेले...
सत्यवती : विचित्रा गेला अम्बी, तुझं माझं काळीज घेऊन गेला. पण, राज्य तसंच आहे, वंश आहे, घराणं आहे. आपण बायकांनीच त्याची

काळजी नको का करायला ? या कुरुवंशातल्या, दूरच्या–जवळच्या... अम्बी, तू बाई मनाला लावून घेणारी !– बोलू का पुढं ?

अंबिका : बोऽला माताजी... एवढं सारं घडून जिवंत आहेच ना ? सांगा.

सत्यवती : दूरच्या जवळच्या– तुमच्याच दिराकरवी पुत्र व्हावेत तुम्हांला.

[ थोडा वेळ शांततेत जातो. अंबिका दुखावते. गप्प असते. ]

अंबिका : दोनच ना महिने झाले–

सत्यवती : अम्बी, त्याचा जीव तळमळून गेला. आता त्याचा आत्मा तर्पणाविना तडफडत असेल ! त्याच्यासाठी–

अंबिका : [ विषादयुक्त निश्चयानं ] माताजी, त्यांच्या आत्म्यासाठी काहीही करीन. सांगा. [ तोंड झाकून बसते. ]

सत्यवती : गंगेयाला विचारूनच ठरवलंय : आजच्याच रात्रीला तयार रहा. धर्माचं काम हे. दुःख आवरायला हवं. प्रयत्नानं का होईना, चेहरा हसू दे. नंदादीपाच्या उजेडात... अम्बी, तू शहाणी आहेस... विचित्राच्या आत्म्यासाठी, या कुरुंच्या वंशासाठी...

[ अंबिका सुन्नपणं ऐकत आहे... सत्यवती बोलायची थांबते. ती वर पाहील म्हणून वाट पाहते. मग निघून जाते. उजेड हळूहळू कमी होत जातो. शेवटी अंधार होतो. त्या अंधारात उजेडाच्या ठिपक्यासारखी पणती घेऊन काशी प्रवेश करते आणि कोपऱ्यातला नंदादीप पाजळते. त्याच्या उजेडात, पलंगावर विचारमग्न बसलेली अंबिका दिसते. काशी मूकपणं आपलं काम करीत असते. ]

अंबिका : काशी, [ काशी तिच्याकडं पाहते. ] पाण्याचा तांब्या आणायचाय... आणखी एक काम आहे. वासाची फुलं आण थोडी. [ काशी आश्चर्यानं बघते. पण काही न बोलता जाते. अंबिका थोडा वेळ बसते, मग उठून नंदादीपाच्या जवळ जाते. वात मागंपुढं करते. ] नंदादीपाच्या उजेडात... अम्बी तू शहाणी आहेस... अगदी हेच शब्द एकान्तात ऐकवायचेत... एकान्त... आता कपाळी एकटीचा एकान्त ! पुन्हा विसरल्ये. आज जगावेगळा एकान्त ! [ पावलांचा आवाज ऐकून थबकते. ] आले का काय ? [ काशी एका हातात तांब्या आणि एकात फुलं घेऊन तिच्यापाशी येते. तिला फुलं द्यायला लागते. ] अग, किती दचकल्ये मी ! मला वास घ्यायला नकोत काही. तांब्याजवळच ठेव. अन् आज गप्प कशी ग ? एरवी चिमणीगत कलकल करतेस ती. [ काशी बोलायला बघते. ] बघतेस काय अशी ! बरं जा आता. ते यायचेत. [ काशीच्या चेहऱ्यावर आश्चर्य ] अग अशी बघू नकोस.

वेड नाही लागलंय् मला. सकाळी ये आता, जा. [ काशी गोंधळल्यासारखी तिथून जाते. अंबिका तिच्यामागं दार लावून घेते. दुसरं दार उघडंच असतं. पण ती ते उघडं असल्याची खात्री करून घेते. सहजच कपाळाशी हात जातो. मग बोटं भांगात फिरतात. ] आहेसच डोक्यावर ! कपाळी दुर्भाग्य आलं तरी केसात सौभाग्य आहेच. सासूबाईंनी दिलेलं. ते मागचं हटत नाही... 'नाही अंबी, असं आक्रस्ताळीपण बरं नाही. तू शहाणी आहेस– अंबालीसारखी नाहीस. ती माझा दुःस्वास करते. तू माझ्याशी प्रेमानं वागतेस म्हणून तुझा करते, दादांनी तुम्हांला आणलं म्हणून त्यांचा करते. अम्बी, दादा पराक्रमी, त्यागी, वचनाचे... यात त्यांचा काय दोष ? त्यांनी तुम्हांला माझ्या पदरात टाकलं...' म्हणून का, पुन्हा त्यांच्या पदरात टाकून निघून गेलात ? ते देवव्रती. तुमच्यासाठी परशुरामांशीही लढले. लढाई काय, खेळासारखी त्यांना ! त्या स्वयंवराच्या मांडवात शंभर राजांशी एकटे लढले. आम्ही भिऊन उभ्या होतो. ते एकटे तळपत होते. वाटलं, पराक्रम पुरुषाचं रूप घेऊन आलाय. वाटलं, आम्ही केवढ्या मोठ्या, आमच्यासाठी ही लढाई. ती होती तुमच्यासाठी. आम्हांला इथं आणलं अन् ते जणू गुप्त झाले. कधी दिसलेही नाहीत. वंशाच्या दिव्याची सेवा आमच्याकडं दिली अन् अम्बेच्या शापाची राख अंगाला लावून स्वतः व्रती झाले. कसे दिसत असतील आता. स्त्रीकडं बघायचंसुद्धा नाकारणारे ते डोळे, रागानं फुलणारं ते नाक, तो पर्वतासारखा देह – आज येणार ? कसे तयार झाले यायला ?...वंशासाठी व्रत सोडलं असेल; वचन मोडलं असेल. भावाच्या आत्म्यासाठी स्वतःच्या भावनांची तिलांजली दिली असेल. सतत जळणारा नंदादीप ते ... मलाही माझा भाग उचलला पाहिजे. आम्ही दुहिता – दोन्ही वंशांचं हित साधायला हवं. दोन्ही वंशांना अखंड चालतं ठेवायला हवं. आमच्यापाशी दुसरं तर काही नाही. घराचा, वंशाचा, गर्भाचा भार वहायची शक्ती आहे. तेवढा वाहू दे निदान ! महाराज, तुमच्यासाठी. तुम्हांला वाचवता आलं नाही, तुमचं नाव तरी वाचवू दे. तुमचं नाही, तुमच्या थोर वंशाचं तरी रक्त – ह्या कायेच्या कुशीतून... रक्त ! ... या माझ्या ओठांना अनंत वेळा भिडलेल्या ओठातून बाहेर यायचं ... [ थकल्यासारखी पलंगावर बसते. ] याच मांडीवर डोकं घेतलं होतं. म्हणालात ... [ पावलांची चाहूल ] 'अम्बी तो येतोय. मला पावलं ऐकू येतायत. [ दाराशी पाराशर उभा आहे. त्याला सोडून निघून गेलेल्या सत्यवतीची पावलं

दूर जाताना ऐकू येतात. ] त्याचं अंग काळंकुट्ट आहे. केसांच्या मोकळ्या जटा आहेत. डोळे लाल आहेत. अंगाला घाण येतेय. तो जिभल्या चाटीत येतोय. बघ, केवढाऽ आहे. [ तिची पाठ दाराकडं. नंदादीपाच्या उजेडात पाराशराची मोठ्ठी सावली तिच्या पुढ्यात पडते. ] अम्बी, मला वाचव. माझ्यासाठी त्याच्या पुढ्यात जा–' ... [ पाराशर आपल्याच नादात काहीसा झपाझप येतो. अंबिका मांडी मोडून उठू लागते. तेवढ्यात पाराशर तिला दिसतो. ती किंचाळते. पलंगावर कोसळते– ]

[पडदा खस्कन खाली येतो. ]

## अंक दुसरा

### प्रवेश तिसरा

[ विचित्रवीर्याची धाकटी विधवा अम्बालिका आपल्या खोलीत आहे. दिवसाच्या दुसऱ्या प्रहरात ती फारशी गडबडीत नाही. आता ती काळी तकतकीत जांभळं खाण्याच्या कामात आहे. दोन तीन जांभळं लागोपाठ तोंडात टाकायची, मग बिया पटापट थुंकून फेकायच्या हा क्रम. एकदोनदा असं केल्यावर कंटाळून की काय, ती एकच टप्पोरं जांभूळ निवडून काढते आणि अर्धं तोंडात घालून तुकडा काढते. उरलेलं अर्धं डोळ्यांसमोर धरते. त्यात तिला अळी दिसते. ती रागानं मान खालीवर हालवते आणि हातातलं अर्धं जांभूळ बाहेर फेकून देते. तोंडातला जांभळट चोथा पण फेकते. आणखी एक जांभूळ घेते. तोच प्रकार. ती जांभळाची ताटली खाली आपटते. ]

**अंबालिका** : काशी, ए काशे,– कुठं काळं केलं हिनं ?– काशे ऽ आलीस का हिकडं ? काशी ऽ ! नाव मोठं क्षेत्राचं ठेवलंय् पण मेलीच्या पायावर नक्षत्र पडलंय जणू. पहिल्या हाकेला कधी आलीय् असं व्हायचं नाही. ए काश्ये ऽ –

[ आल्येऽऽ अशी पडद्यातून साद आणि ती विरायच्या आत काशी उपस्थित. तिच्याही हातात जांभळं आणि ओठ काळसर. ]

**अंबालिका** : काय ग, कुठं गेली होतीस ? ही काय इथंच होत्ये म्हणून सांगू नकोस नेहमीसारखी. जांभळंच खातेय्स ना ? डोळे कुठं होते तुझे ? कुठून आणलीस, सांग.

**काशी** : डोळ्यांचं सांगू का जांभळांचं सांगू आधी ?

**अंबालिका** : अगदी बरोबरीनं वागायला लागलीस हां काशे. थांब तुला सांगते. दासी ती दासी–

**काशी** : बऽरं. जांभळांचं सांगत्ये आधी. ती ना, जांभूळ बेटावरून आणली. माळी म्हणाला, 'स्वता शांतनूमहाराजांनी झाड लावलंय हे' म्हणून मग आणली.

अंबालिका : होय का ? 'स्वता सासूबाईनी पाणी घातलंय त्याला' असं नाही का म्हणाला माळी ?

काशी : तसं नाही म्हणाला.

अंबालिका : मग त्यात अळ्या आहेत म्हणून कशाला सांगतोय !

काशी : अळ्या निघाल्या त्यात ? अग बाई ! मी तर–

अंबालिका : मग उगाच का कोकतेय मी ? नष्टे–

काशी : मी तर ताईनासुद्धा दिली. अता वो !

अंबालिका : आता वो काय ? अग वेंधळे, त्या आंधळीला आता तरी जाऊन सांग; नाही तर ती खाईल जांभळागणिक अळी !

काशी : बाई, अळीमिळी गूऽप चिळी. [ तोंडावर बोट दावीत पळून जाते. ]

अंबालिका : स्वतः शांतनूमहाराजांनी झाड लावलंय म्हणे ! तरीच. यांची फळं किडकी, यांची मुलंऽ किडकी...

[ ताटली उचलते आणि जांभळांसकट फेकून देते. ताटली पडल्याचा आवाज येतो. त्याच वेळी सत्यवतीची मावशी आत प्रवेश करते. ]

मावशी : काय अंबालीबाय, आज कुनाचं काय ?

अंबालिका : य्या ! सासरचाच नगारा वाजवीत होत्ये.

मावशी : व्हय का ग ! मंग कालीसुधा उगंचच भेली. तरी मी म्हनले : अग, सुनंला भिशील न् उपाशी राहशील. पन काय ग, झालं काय सासरचं ?

अंबालिका : काय व्हायचं राहिलंय ? थोरल्या बहिणीगत रानात जायला मोकळ्या झालो आम्ही.

मावशी : वाऽग वाऽ! आलं मनात कि गेलं रानात– असं कधी असतं काय ? अंबाली, कालच न्हालीस ना जनू.

अंबालिका : सासूबाईनी सांगितलं असेल. कुठूऽन माउलीला दिसतं सारं !

मावशी : अग, तिच्या मनाला ध्यासच त्यो. नवरा गेला, लेकरं गेली... आता सुनांच्याकडं बघायचं न् दिवस कसं तरी काटायचं.

अंबालिका : थोडं कमीच बघा म्हणावं, सुनांलासुद्धा चढवाल सरणावर–

मावशी : अंबाली–

अंबालिका : काऽही खोटं नाही त्यात. कळून सवरून सोंगं करायची मला नाही जमत. सांगा बघू : तुम्हांला काय तरी काम देऊन तुमच्या भाचीनंच धाडलं का नाही ?

मावशी : तुझ्यासमुर यायचं तर मिठाची गुळनी धरून यायला होवं बाई !

अंबालिका : मीऽ मिठाची गुळणी थुंकायला लावीन. ताकाला जाऊन भांडं का लपवता ?

मावशी : बाइ ग, समदं सांगत्ये. तूच म्हनशील : म्हातारीला नाही लाज न् असलं आनलं काज !

अंबालिका : बोला झटपट !

मावशी : अग, कालीला वाटतंय– नातू व्हवा.

अंबालिका : मातीचा करा म्हणावं, सरणात भाजला तरी पक्का परत येईल.

मावशी : अग, मंग अंबालीकडं कशाला, कुंभारीकडंच गेल्ये असत्ये. धडधाकट सुना न् नातू तेवढा उना – मला म्हनली मावशे, काय ग करू ? म्हनलं 'बघ बाई. अग, दीर-भावजयांची गाठ घाल.' म्हनते : मी पुसते दिराला, तू पूस भावजयीला.

अंबालिका : मला पुसायला भ्याल्या वाटतं स्वता. अजून थोडी पाळून आहेत तर ! बरं का मावशी, आमच्या राहत्या वाड्यामागं एक मोठं पटांगण होतं. त्यात होतं एक बाभळीचं झाड. तिला ना, गाभवणी बाभळच म्हणायचे.

मावशी : नावात नाव सोधून काढलं !

अंबालिका : ऐका. लहानपणी आम्ही घरावर चढून बघायच्या. तिथं किनई, गाईला आणून बांधायचे. अन् मग बैल सोडायचे तिच्यावर. एकेक गाय चांगली लाथा झाडायची...

मावशी : जनावराच्या जातीत तसंच असतं–

अंबालिका : बरं का मावशी, हा वाडा ना आपला, त्या बाभळीसारखा आहे. आम्ही– बांधल्या गाई. लाथ झाडायची मात्र मुभा नाही. गोठ्यातला गोऱ्हा खपला तर गावातला वळू सोडला सासूबाईनी...

मावशी : अग अग... गप बाई... [ तिच्या तोंडावर हात धरायला बघते. अंबालिका तिचा हात परतवून लावते. ]

अंबालिका : का ऽ ? तोंड धरण्यातकं वाईट बोलतेय का मी ? आमरण ब्रह्मचारी ना आमचा दीर ! देवव्रत ! भीष्म ! करा कौतुकं. अखेर हेच करायचं होतं तर आम्हांला धरून आणून का लोकाच्या हवाली केलं ? का बहिणी-बहिणींला सवती-सवती केलं ?

मावशी : अंबालीबाय, म्या सांगावंच काय ? ज्याची त्याची रीत सवती. कुनाला पावती न् कुनाला भोवती. तुमचं सोयंवर, आमाला जल्माला ठाऊक नव्हतं !

अंबालिका : स्वयंवर ? मोठं स्वयंवर ! नाव मोठं न् लक्षण खोटं ! म्हणे मुलीनं स्वतः नवरा निवडायचा. वाट बघा. सगळ्यात दांडगा असेल त्यानं लांडग्या-सारख्या ओढून न्यायच्या मुली !–एक नाही, दोन नाही, तीन ! अन् टाकायच्या वाटून. शाहण्यानी लुटायच्या अन् खुळ्याला वाटायच्या.

मावशी : अशा बोलण्यानं दोन्ही घरांचं नाव जातं बाई !

अंबालिका : मावशी, तुमच्या घराचं नाही ना जायचं ? घऽर, घराणं, वंशाचा मान, कुळाचा मान–सगळ्या सगळ्याचा कंटाळा आलाय मला. काय पाहिलं आमच्या वडिलांनी न् दिल्या तिन्ही मुली एकाच्या हाती ! बाकीचे वंश ओस पडले होते का हो ? एका बाबात तिघींना सधवा न् तिघींना विधवा करून टाकलं ते ! अन् आता ह्या ऊंच घराण्यातल्या सासूबाई दिराला लावताहेत भावजयीकडं.

मावशी : अंबाली, तुझ्या मनात नाही, तर राहुदे बाई. म्हनत्यात ना, धन्यानि धाडला सांगावा तर तिकडून आला कांगावा. मी सांगल्ये तुझ्या सासूला.

अंबालिका : काय सांगाल ? मी तयार नाही म्हणून ? छेः ! अहो, मी अगदी तैयार आहे. अहो, कळायला लागलं तेव्हापासून सारा जुलमाचा रामराम. आता ह्यानं काय व्हायचंय ? आधी माणसाच्या जातीत अन् त्यातल्या त्यात ऊंऽच घराण्यात जन्माला आलो...आता मुकाऽट सारं भोगायचं; तरच घराण्याचं नाव राहतं...आजच येउद्या आमच्या दिराला. चांगली, दिव्याच्या साक्षीनं त्याच्या स्वाधीन होईन. सांगा तुमच्या भाचीबाईला, जा.

[ मावशी निघून जाते. अंबालिकेला त्राग्याचा ताण असह्य होतो. दोन्ही हातांत तोंड धरून ती हुंदका देते. हळूहळू अंधार दाटत जातो. काशी मोठा दिवा दोन्ही हातांत धरून येते तेव्हा तो अंधार सरतो. अंबालिका अस्वस्थपणे कधी बसते तर कधी फेऱ्या मारते. काशी तिचा बिछाना करू लागते. ]

अंबालिका : काशे,

काशी : काय, बाई ?

अंबालिका : काशे, तुझा थोरला भाऊ होता ना ग ?

काशी : दोन होते बाई.

अंबालिका : अग मी किती होते नाही विचारलं. एकजण रथ हाकायचा.

काशी : होय बाई. भिंगरीसारखा पळवायचा !

अंबालिका : लग्न झालं का ग त्याचं ?

काशी : कुणास ठाऊक बाई ! इकडं आल्यापासून मी तरी कुठं गेलेय घराला. बाई, आपण जायचं का हो एकदा काशीला ?

अंबालिका : [ तुटकपणं ] पाण्याचा तांब्या आण जा. वास कसला येतोय ग ?

काशी : रातराणीची फुलं आहेत ओच्यात. तुम्हांला हवीत ?

अंबालिका : फुलं ना ? हवीत ना ! कण्हेरीची आण. चांगली टोपलीभर आण. आज

तीच चांगली. जा. बघतेस काय अशी? माघारी येऊ नकोस, जा. [ काशी तिच्याकडे बघत काढता पाय घेते. ]

काशी : [ जाताजाता ] पाणी पण नको?

अंबालिका : उद्या सकाळी माझ्या नावानं सोडा,– आत्ता नको, जा. [ काशी जाते. अंबालिका तिच्यामागं खाडकन दार लावते. ] अम्बे, तू ह्यातनं सुटलीस! हट्टानं मागं लागून या घरात राहिली असतीस तर हे सारं भोगावं लागलं असतं. रानात गेलीस ते याहून फार बरं! तशी तू दैवाची ग! स्वयंवरातसुद्धा तुझं शाल्वावर मन गेलं. अन् तो राजवंशातला. आम्हांला मन कुठं तरी घालवायचं असतं हेही कळत नव्हतं. गेलं ते भलत्याच ठिकाणी. अम्बे, अग कुणाला सांगतासुद्धा आलं नाही. आपल्याला स्वयंवरांच्या मांडवात न्यायला सजलेला रथ आला... पायघोळ पांघुरणं अन् अंगभर अलंकार, त्यांनी मला चढता येईना... सारथी आला हात द्यायला... होय, अग आपल्या काशीचा भाऊ. नटून आला होता. कमरेला तंग धोतर अन् वर कमरपट्टा, डोक्याला टोप, दंडावर कडी अन् बाकी... कोरीव उघडा. त्याच्या पिळदार कातीव हातानं वर खेचलं मला... मांडवात सारखं वाटत होतं ह्यालाच घालावी माळ!... पण राजाच्या मुलीनं सूताच्या गळ्यात माळ घालायची? सगळ्यांनी मिळून शेण घातलं असतं माझ्या तोंडात... अम्बे, तुला सांगता तरी आलं कुणावर मन बसलंय. मला तेही सांगता आलं नाही... पण अम्बे, अजाणपणात मनावर ठसलं ते जाणतेपणीसुद्धा पुसलं नाही. दैवगतीनं जे ध्यान वाट्याला आलं त्याला माझ्या वाटेला नाही जाता आलं फारसं. मला तो सारथी डोळ्यापुढं दिसायचा अन् समोरच्या दुबळ्या कुडीची चीड यायची! अंगाची लाही व्हायची अन् मी आग ओकायची. लोकांना वाटतं, या दोन बायकांमुळं त्यांच्या नवऱ्याचं चिपाड झालं. खोटं ग ते. अग, त्याला बायको अशी एकच होती – ती म्हणजे अम्बी. तो पेदू, ही डोळ्यात अधू. त्यांचं जमलं. अन् मी झाले आगपाखडी! अम्बे, मला आनंद पारखाच झालाय बघ. एकदाच खरा आनंद वाटला... तू परशुरामाला घेऊन आली होतीस या नगरावर, तेव्हा आमचा शेळपट धनी – विचित्रच वीर्य ना त्याचं! तो थरथर कापत धावत आला... तेव्हा. तेव्हा वाटलं, सूड पुरा झाला. पण तो वयस्क कपी पुन्हा आडवा पडला. अम्बे, तुझा सूड अपुरा राहिला... तो मी आज पुरा करत्ये. बापाच्या लग्नापासून आजच्या ह्या पापाच्या लग्नापर्यंत हा सोवळा बगळा नेहमी प्रतिज्ञेच्या

गोष्टी करीत आलाय. आता त्या म्हाताऱ्या कोळणीनं त्याच्याच शब्दाच्या जाळ्यात त्याला पकडलं असणार! कारण, ह्या उंच थोर आणि पवित्र वंशाचं पोट भरलं पाहिजे ना. ये म्हणावं. ज्या प्रतिज्ञे-साठी माझ्या अंबेला उन्हातान्हात जळायला लावलंस, ती प्रतिज्ञा आता माझ्या अंगच्या धगीत तुला जाळायला लावते. मी पण जळेन? छे! राखेला काय जळण्याची भीती? [ पावलांची चाहूल. ती कानोसा घेते. विकटपणं ] येतोय. ये, ये, भोग – [ दारातून भयानक दिसणारा पाराशर आपल्या धुंदीत आत येतो. ] तू? तू कोऽण? [ संतापानं थरथर कापू लागते. पांढरीफटक पडते. ]

[ पडदा. ]

## अंक दुसरा
### प्रवेश चौथा

[ वर्षाभराच्या धृतराष्ट्र बाळाला, न्हाऊमाखू घालून छातीशी धरून अंबिका प्रवेश करते. खोलीतल्या पाळण्याकडं जाते. बाळाला पाळण्यात ठेवून त्याच्याशी लाडानं बोलते. तो मधूनमधून रडतो म्हणून झोका देते. ]

अंबिका : च्यला, आता झ्योपा बघू. ल्बाऽड – हसतो नुसता. दिवसभर कोण रे खेळेल तुझ्यासाठी ? हां [ त्याच्या रडण्याचा आवाज ] लडू नकोऽ खेळेन तुझ्याशी. दिवसभऽल खेळेन हां. मीच ल्हान झाल्येय आता. तू म्हात्ताला हो हां बाळ... बऽघ. नुस्ताच हसतोय. थांब हं. आता रागावतेच तुला. झोप बघू. [ त्याला तर्जनी दाखवते. तेवढ्यात तटकन हात खाली घेते. डोळे भरून येतात. कापऱ्या आवाजात बोलते. ] नाही हं रागावणार. दैव आधीच रागावलंय तुझ्यावर. अंधारउजेड सारखाच झालाय तुला. [ तो रडतो. ती मोठा झोका देते. ] जोऽ जोऽ नीज रे बाळा. काऊ चिऊ, झोप नका नेऊ... अजून जागाच !

[ काशी आत येते. बाळाला न्हाऊ घालताना ओले झालेले कपडे तसेच आहेत. तान्ह्या मुलाबद्दलचा उत्साह तिच्या एकूणच वागण्यात आहे. ]

काशी : अजून जागाच ?

अंबिका : हो ना ग. तू बघ बरं जोजावून त्याला. सगळं करून झालं. झोपच कमी बघ त्याला.

काशी : मावशी सांगत होत्या – चपळ मुलांना झोप कमीच असते म्हणून. काल घेतला होता ना तर आवरेना मला. अन् बोट तर ना, एकदा घट्ट धरलं की सोडीतच नाही. [ पाळण्यात बघते. ] हसतोय बघा. मी बोललेलं सारं कळतं त्याला.

अंबिका : [ हसते ] कळायचंच. मग असंच कर ना. एक गाणं म्हण त्याला.

काशी : मला बो कुठं येतायत गाणी ?

अंबिका : वा ग वा ! तुझी आई यायची वाड्यात, तिला किती गाणी यायची. जात्यावर गाणी म्हणायची ना त्यात आमची नावं घालायची. एकदा म्हणाली हत्तीच्या पाठी अंबाली मोठी ... तर ना आम्ही अंबालीला किती चिडवलं. तुझ्या नावाचं गाणं असेल ते तरी म्हण.

काशी : बरं का ताई, घरीसुद्धा दळीत असली ना तरी तुमचीच नावं ओवायची ती गाण्यात. मी एकदा म्हटलं, माझं नाव घाल. तर म्हणाली, ' राजाच्या लेकरांची नावं घालायची– का तुमची ? नाव घेण्यासारखं हाये काय तुमच्यात ? '

अंबिका : असं म्हणाली आई तुझी ? कशी ग जीभ धावली तिची ?

काशी : ताई, सांगू नाही; तुम्ही पुसलं म्हणून सांगत्ये. आपण हिकडं यायला निघालो तेव्हाची आठवण आहे का तुम्हाला ?

अंबिका : आठवण ? अग, किती रडली तुझी आई – माझी लेकरं चालली म्हणत ! अंबाबाय, अंबीबाय, अंबालीबाय – असा नुसता जप चालला होता रडता रडता.

काशी : होय का नाय ? मग मी सांगायला गेले, आई ग, चालले म्हणून... तर मला कातवून म्हणाली, ' जाऽ. नीट राहा. नाय तर याल बोंबलत माघारी. मला नाय बळ आलं टुकडं घालायला ! '

अंबिका : बाई ग ! पोटच्या पोराला असं ? बहिरं आंधळं असलं तरी आपलं आपल्याला. [ आपण काय बोलून गेलो असं वाटून गप्प राहते. ]

काशी : [ पाळण्यात डोकावते. ] झोपला बघा आपण बोलता बोलता. [ दारातून दूर पहाते. ] ताई, माताजी येतायत वाटतं. आमी पळतो. नाय तर पांडूबाळावरनं निघंल आमची.

[ काशी लगबगीनं जाते. सत्यवती आत येते. पाळण्यात बघते. ]

सत्यवती : झोपलाय वाटतं.

अंबिका : हो. फार वेळ घेतो झोपायला.

सत्यवती : त्याच्या काय वेळाचं ! जागा न् झोपला सारखाच.

अंबिका : तेही खरंच. लहान मुलाला काय वेळाचं !

सत्यवती : लहान मुलाचं म्हटलं तरी याचं वेगळं, दुसऱ्यांचं वेगळं.

अंबिका : वेगळं खरं – पण इतक्या लहानपणी कशाला त्याच्या राजेपणाची चिंता ?

सत्यवती : अम्बी, कशी ग बाई भोळी तू ! लेकरात इतकी गुंतूऽऽन गेलीयस की–

अंबिका : माताजी, जीव गुंतवायला आणखी काय पाहिजे ? आईबापांनी

आपल्यावर माया केली, आपण आपल्या मुलावर करायची. मायेची धार संतत वहावी म्हणूनच ना संतती !

सत्यवती : अग अम्बी, तशी तर गायसुद्धा वासराला चाटते अन् कावळीसुद्धा पिलाला भरवते. पण त्यांच्यात न् माणसात फरक नको का करायला ? माणसाला नाव आहे, गाव आहे, मान आहे, प्रतिष्ठा आहे. उगाच एखादं खुळं जन्माला आलं तर कुणाला बरं वाटेल ?

अंबिका : बरं कसं वाटेल माताजी ? पण आपुलकी वाटायची ती वाटेलच की नाही ?

सत्यवती : कुणास ठाऊक बाई. धृताचंच बघ ना. तो जागा काय न् झोपला काय; त्याला दिसतच जिथं नाही, तिथं काय फरक पडणार म्हटलं !

अंबिका : न का दिसेना ! बाकी सारं बघा किती चांगलं आहे ते. हाडपेर बघा, नाकडोळे बघा, नुसता पाह्यला तर वाटायचंसुद्धा नाही याला दृष्टी नाही म्हणून. बुद्धीचं म्हणाल– तर लबाडाला बोलावं तेवढं कळतं.

सत्यवती : बाई ग, सारी प्रजा काही आईच्या नजरेनं नाही पाहात राजाला. एवढा खटाटोप केला मी ! तुला हवं नको व्हायला लागलं तेव्हाच नावसुद्धा ठरवून टाकलं–धृतराष्ट्र ! म्हटलं, राज्याला अगदी बांधून ठेवील धानाच्या पेंढीसारखं. झाल्यावर बघते तर हा प्रकार. सहा महिने झोप उडाली माझी !

अंबिका : माताजी, त्याला नाही जमलं राज्याचं, तर पांडू आहे की. भाऊच आहे त्याचा. माझी मुळीच ना नाही !

सत्यवती : माझी आहे ना ! राज्य कुणी करायचं ते मी ठरवणार बरं बाई. भाऊच आहे न् बहीणच आहे म्हणून ते ठरत असतं तर एवढा थोरला युवराज घरातच होता की. तुझ्या ध्यानातच नसतं वाटतं थोरली आहेस म्हणून. सगळं कसं मानाप्रमाणं व्हायला हवं. पांडू कोण राजा होणार ? अम्बालीला मी कितीक मानत्ये माहीत आहे ना तुला ! तिच्या लेकाला राज्य ? अग, मी आपली पहिल्यापासनं काळजी घेतली– म्हटलं, अम्बीला मुलगीच झाली तर काय घ्या. पण आता काय माझ्यामागं तिला राजमाता होऊ देईन ?

अंबिका : माताजी, एवढी लांबची धोरणं काही मला समजत नाहीत. त्यांचा उपयोग तरी काय ? मन चिंती एक, दैव चिंती भलतंच. तुम्ही खूप प्रण केला होतात– माझाच वंश राज्य करील म्हणून; काय झालं त्या प्रणाचं ?

सत्यवती : भोळी ग भोळी ! माझा प्रण पुराच केला बरं का ? पांडू, धृता कुणाच्या वंशाची वाटली तुला ?

अंबिका : माताजी, ते आमच्या पोटचे गोळे. अन् आमच्यावर जन्मोजन्म अधिकार आमच्या पतीचा. अशा दूरच्या नात्यानं ते तुमच्या वंशातले. पण वडलांकडून बघितलं तर काय? मला विचाराल तर–

सत्यवती : तुला काय विचारायचंच? तुझी आठवणच पार बुजली होती. नुसती बरळायचीस–तो काळाकुट्ट आहे. त्याच्या अंगाला वास येतो आहे. काय न् काय! सगळ्यांना नवल वाटायचं पण वर्म ठाऊक होतं मला. दारापर्यंत माझ्या क्रिष्णाला पोचवायला आले तेव्हासुद्धा बरळत होतीसच ना!

अंबिका : क्रिष्णा? हा कोण क्रिष्णा?

सत्यवती : अम्बी, अनायासानं गर्भारशी व्हायला तू काही गंधर्वी नाहीस. तुझ्या मनात संशय दिसतोय. मी काढून टाकत्ये, ऐक. तुझ्या लाडक्या मुलाचा पिता, माझाच मुलगा. कृष्ण पाराशर त्याचं नाव.

अंबिका : तुमचा मुलगा?

सत्यवती : मग तेव्हा तुझा दीर म्हणून खोटं सांगितलं होतं की काय तुला? असं खोटं नाही बोलत मी. तुझ्याकडं आलेला तो काळा, वास मारणारा पुरुष तो माझाच लग्नाआधीचा मुलगा बरं!

अंबिका : कुवारपणचा?

सत्यवती : अम्बी, अग पोटच्या गोळ्याचं ना सांगत होतीस आत्ताच? जिला दिवस गेले ती कुवार असते काय ग? का भटानं ओम् ठोम् म्हटल्या-वाचून मुलं होऊच नाहीत?

अंबिका : कोळीण शोभलात माताजी...

सत्यवती : हां. वेडंवाकडं बोलू नकोस. मीसुद्धा उपरिचर राजाचीच मुलगी आहे म्हटलं.

अंबिका : असाल, असाल. आता चला. बाळाला पाजायची वेळ झाली. पिताना पाहिलंत तर वासना उडेल त्याची.

सत्यवती : मी निघालेच. अन् त्या श्रुताचं कौतुकई नाही मला मोटं. तुलाच थोडं सांगायचं होतं. पूर्वी वाटायचं तुझी कूसच वांझी. पण तशी चांगली आहे हो. फळाला येते. आणखी एकदा करून बघ.

अंबिका : दया करा माझ्यावर – आता चला.

सत्यवती : तुझी दया येते, म्हणून तर धडपडते. अंबालीला नाही गेले सांगायला ती! आत्ता नाही काही वाटताय्, पण वय झाल्यावर काय करशील? हा काही व्हायचा नाही तुझी म्हातारपणची काठी. तुलाच व्हावं लागेल आंधळ्याची काठी. एकाला दुसरा असावा; विचार कर.

अंबिका : तुम्हाला म्हातारचळ लागलाय. निघा आता.

सत्यवती : तू भोळी आहेस म्हणून सांगत्येय. विचार कर. क्रिष्णाला पुन्हा विचारून आल्येय मी.

अंबिका : पुन्हा आला तर काशीला सांगीन डोक्यात काठी घालायला.

सत्यवती : तो येणारच नाहीये. खूप विनवण्या केल्या तेव्हा कुठं तयार झाला. पण म्हणाला, 'तुझ्या घरी येऊन त्या पोरींना शुद्धीवर नाही आणीत बसणार. आपण होऊन येऊ देत माझ्या इथं. तिन्हीसांजच्या वेळेला.' [ अंबिका बोलू पाहते ] थांब. माझं होऊ दे...

अंबिका : झालं तेवढं पुरे. मी जाणार नाही.

सत्यवती : तो आहे देवीचा उपासक. साधनेचा भाग म्हणून भोग देतो. मी दिवस पण ठरवून आल्येय. मी चार दिवस तीर्थाला जाणार आहे तेव्हा रथानं जा. सूताला जागा ठाऊक आहे.

अंबिका : मी जाणार नाही.

सत्यवती : विचार कर. नीट ऐक. तो सिद्धपुरुष आहे. दिलं वचन पाळलं नाही तर कोपेल. अन् त्याचा शाप बाधेल तुला अन् तुझ्या आंधळ्या पोराला... [ झटक्यानं निघून जाते. अंबिका सुन्नपणं बसून राहते. ]

अंबिका : कोऽप. शाऽप. पाप कर नाही तर शाप बाधेल. कोळीण कुठली! मासळी नुसती मारून भागत नाही हिचं. ती भाजायला पाहिजे वर. मला भोळी म्हणते, माझी कळकळ दाखवते. पण या विषारी मधाचा थेंब पुन्हा घेणार नाही. महाराज, कसल्या हो आईच्या कुशीत – नाही नाही. तुम्हांला जन्म दिला म्हणून तरी तिला वेडंवाकडं बोलायची नाही. पण तुमच्या आत्म्याची गोष्ट केली अन् असा कावा केला हे विसरत नाही... क्षमा करा... [ पाळण्यात रडण्याचा आवाज. ती उठून पाळण्याला झोका देते. धृतराष्ट्र कधी रडतो तर कधी थांबतो. ] रडू नकोस बाळा. तू ऐकलंस वाटतं आजीचं बोलणं. आंधळा म्हणते तुला. तुझा काय दोष त्यात. माझ्या डोळ्यांवर पडदे आलेयत. तीच देणगी तुला दिली! पण बाळा, दृष्टी नाही म्हणून आंधळं असणं बरं– डोळे झाकून नाही नाही ते करणारी स्वार्थांधळी फार वाईट. तू अगदी भिऊ नकोस बाळा. मी होईन तुझी आंधळ्याची काठी. नऊ महिने वागवला तशी जन्मभर वागवीन. आता आणखी भाऊ नको, बहीण नको! निकोप जन्मली तर तुझा उपहास करतील. माझ्या प्रेमात वाटेकरी होतील. अन् या स्वार्थी जगात राज्याबिज्याचा लोभ सुटेल त्यांना. नकोच ते. त्यापेक्षा तू एकटा रहा. माझा आशीर्वाद आहे तुला – 'तू एकटा पडायचा नाहीस. शंभऽर मुलगे होतील तुला.' राहणार ना एकटाच? मग, मला त्या भयानक प्राण्याकडं

जावं लागायचं नाही. माझी विटंबना टळेल. तुझं भलं व्हायचं असतं ना, तर विटंबनासुद्धा अगदी आनंदानं सहन केली असती. मनातल्या निर्मळ प्रेमाला शरीराची विटंबना काय करणार आहे? [ तो मोठ्यानं रडतो. ] 'शाप बाधेल – दिलं वचन पाळलं नाहीस तर कोप होईल. तो सिद्धपुरुष आहे... तुझ्या आंधळ्या पोराला शाप बाधेल त्याचा'... नाही नाही... [ जोरानं हात फेकते. त्यानं पाळण्याला मोठा झोका बसतो. ती डोकं धरून खाली बसता बसता बोलते. ] शाप बाधू देणार नाही!... [ धृतराष्ट्र मोठ्यानं रडतो. काशी धावत येते. ]

काशी : बाळाचं रडणं ऐकलं. म्हणलं बाहेर गेलात काय. [ पाळणा थांबवते. ] झोका कशाला देताय. दुपटं भिजवलंय त्यानं. [ दुपटं बदलते. ] आता कसा हसलास?... ताई, अशा काबो बघताय?

अंबिका : अग, कुठं काय? बाळ आवडतो ना ग तुला?

काशी : असं काबो विचारताय?

अंबिका : नाय ग, त्याच्या कल्याणासाठी, एक काम करायचंय. तू करशील का ग?

काशी : हो ऽ

अंबिका : कुणाला कळलं नाही पाहिजे.

काशी : मी कशाला कुणाला सांगायला जाते. पण माताजी सारख्या खोदून विचारत्यात ना – आज काय झालं, काल काय झालं.

अंबिका : त्यांना तर मुळीच नाही सांगायचं.

काशी : ब ऽ रं, काम सांगा आता.

अंबिका : रथात बसून लांब जायचं.

काशी : मग तर त्यांना नेमकंच कळेल की.

अंबिका : अग, त्या तीर्थाला जाणार आहेत ना तेवढ्यात जाऊन यायचं.

काशी : तुमी पण येणार ना?

अंबिका : अं ऽ हो – नाही!

काशी : मंजे काय?

अंबिका : काशी, तू माझ्याएवढीच आहेस ना ग?

काशी : ताई, एकदा ना, गंमतच झाली! मी अशीच चालले होते तर मागून हाक आली, 'अंबी, अंबी' म्हणून. मागं बघितलं तर ना – विचित्रक महाराज! मला इतकं लाजायला झालं, की मी पळूनच गेल्ये.

अंबिका : महाराजसुद्धा फसले ना. मोठी फसवी आहेस हं.

काशी : तुमच्यासारखा आवाजसुद्धा काढता येतो मला.
अंबिका : होय ना... माझं महावस्त्र पण देईन तुला नेसायला.
काशी : तुमचे पहिले दागिने पण घालायचे ?
अंबिका : [ क्षीणपणे ] नको – नाही तर घाल.
काशी : वा : ताई. मग तर कुणीही म्हणेल – अंबिकाराणी आल्या ! राणीचा मान मिळेल मला ?
अंबिका : [ विचारात ] होय. राजा होता तेव्हाच मिळायला हवा होता. आता ... राजा नाही ... म्हणून मिळेल. काशी, राणीचे सोहळेच भोगायचेत तुला.
काशी : रथात बसली कीच सारथ्याला सांगीन – सूता, चल ... पण जायचं कुठं हो ?
अंबिका : [ हसते ] मला वाटलं, पोचलीस तू. अग, त्या तिकडं, एक साधूबाबा राहतात. त्यांच्याच प्रसादानं बाळ झाला मला. त्यांच्याकडं जायचं अन् मी आल्ये म्हणून सांगायचं.
काशी : मी म्हणजे, मी का तुम्ही ?
अंबिका : अगं, मग ऐकलंस काय एवढा वेळ ? मी म्हणजे मी – अंबिका राणी ! कळलं ?
काशी : म्हणजे बतावणी करायची ना ? बघा, आता कशी करते ती. परत आल्यावर तुम्हालासुद्धा कळायचं नाही, मी अंबिका, का तुम्ही अंबिका ते ! [ एकदम थांबते. ] पण, काय हो ताई, त्यांनी प्रसाद दिला–
अंबिका : [ विलक्षण गंभीर. तिचे दोन्ही दंड धरते आणि व्याकुळपणं तिच्याकडं पाहते. ] का शी, बा ळा च्या क ल्या णा सा ठी त्यां चा प्र सा द तु ला ब रो ब र आ णा वा ला गे ल ग !

[ पडदा. ]

## अंक दुसरा

### प्रवेश पाचवा

[ तिन्हीसांजच्या वेळेला अम्बिकेचा वेष घातलेली काशी पाराशराच्या गुहेशी उभी आहे. विजयेच्या अमलाखाली पाराशर आत आहे. ]

काशी : आत आहात का हो ?

पाराशर : आवाज स्त्रीचा वाटतो; होय ना ?

काशी : होय.

पाराशर : हस्तिनापूरच्या राणीवशातून आलीस काय ?

काशी : बरोबर.

पाराशर : मला 'तू को ऽ ण ' म्हणणारीच का ?

काशी : असं नाही म्हणाले मी. मी—

पाराशर : बरं बरं; नाव काय तुझं ?

काशी : महाराज, —

पाराशर : अरे, स्त्री म्हणवतेस अन् महाराज नाव सांगतेस. हे काय सोंग आहे! नावगाव नीट सांगावं माणसानं.

काशी : [ घसूकन ] काशी — [ एकदम जीभ चावते. ]

पाराशर : ते माहेर ना तुझं ?

काशी : [ 'सुटले ' असा भाव. ] होय महाराज.

पाराशर : मग त्याचं काय राहिलं आता ? मघाशी ... हस्तिनापूर म्हणालीस ते बरोबर होतं. काय समजलीस ?

काशी : ते बरोबर होतं.

पाराशर : बरं आता सांग... इथं कशाला आलीस ?

काशी : बाळाच्यासाठी तुमचा प्रसाद—

पाराशर : हॅः हॅः हॅः, माझा प्रसाद ! मी कालीचा प्रसाद मागतो, ही माझा प्रसाद घेणार ! काय ग, आपल्या मनानं आलीस ?

काशी : होय, महाराज.

पाराशर : काळीनं सक्ती केली म्हणून नाही ना ?

काशी : नाही. त्यांना ठाऊकसुद्धा नाही !

पाराशर : हे छान. डौलात आलीस का ?
काशी : होऽ. माझ्या राणीच्या महावस्त्रात –
पाराशर : ते फेकायला लागेल. राणी म्हणून आलीस का ?
काशी : होय, – नाही. मी आपली, दासी आहे.
पाराशर : अश्शी – अश्शी वाकून ये ! सगळ्या उपाधी टाकून ये. काय ग, माझ्याकडं या वेळी येताना भीती नाही वाटली तुला ?
काशी : भीती कशाची महाराज ? आपण सिद्धपुरुष आहात कळलं होतं ना आधीच.
पाराशर : तेव्हा ते माहीत नव्हतं नाही का ? बरोबर ! असंच निर्भय होऊन यायला पायजे. पण तुम्ही स्वार्थी असता, स्वतःच्या सुखासाठी येता–
काशी : नाही महाराज, मी माझ्या सुखासाठी नाही आले...
पाराशर : विश्वास ठेवतो मी तुझ्यावर. साधनेत हीच भूमिका लागते. आजकाल शिवशक्तीच्या अद्वैताचा ध्यास लागलाय मला – तुला कळतंय का माझं बोलणं ?
काशी : नाही महाराज. मी अज्ञानी, बाई, त्यातून– [ घोटाळते. ]
पाराशर : अज्ञानी आहेस म्हणजे अंधारातच आहेस तर.
काशी : अंधार कधीचा पडला, महाराज !
पाराशर : निवळेल, निवळेल. गुह्यविद्या आहे ही ! बाहेरून पाहणाराला कळणार-सुद्धा नाही. त्यांना वाटेल, हा वामाचार आहे. अरेऽ शिवाचा वामेशी आचार आहे हा... चल ग, आत ये. आतही अंधारच आहे. जपून ये. पण निर्भय ये, निःसंग ये, निःस्वार्थ ये, निःशंक ये. मायेचं आवरण टाकून ये, आपल्या खऱ्या रूपात ये– स्त्री म्हणून, शक्ती म्हणून ! [ काशी आवाजाच्या रोखानं शांतपणं आत जाते. अंधारच अंधार दाटतो... हळूहळू पहाट होते. तांबडं फुटतं आणि सूर्योदय व्हायला लागतो. एका रात्रीत प्रौढ झालेली काशी गुहेच्या आसपास वावरत आहे. ती मधेच एखाद्या दगडावर बसते आणि संमिश्र वृत्तीनं इकडे-तिकडे पाहते. तटकन उठते, सफाई करते. एकदा घड्यातलं पाणी तोंडावर फिरवते. एकदा आत जाऊन पूजा-साहित्य, पाटा-वरवंटा बाहेर आणते. मधेच पायवाटेकडं दूरवर उत्सुक-तेनं पाहत असते. त्या वाटेवरून पाराशर परत येताना दिसतो. सजग पण स्वतःच्या नादात. गुहेजवळ मनुष्याकृती दिसली म्हणून एकदा थांबून निरखून पाहतो. 'ही काय पिडा' अशा मुद्रेनं चालू लागतो. जवळ आल्यावर झटक्यानं उभा राहतो. काशीला त्याची चाहूल लागते आणि हातातलं सामान तसंच ठेऊन ती मान खाली

करून उभी राहते. अवघडून त्याच्या पायाकडं बघत असते. मघेच त्याच्या मुखापर्यंत नजर उचलते, खाली आणते. ]

पाराशर : माझ्या सामुग्रीला हात लावणारी तू कोण ? [ काशी उत्तर न देता उभी राहते. तिच्या हातचं साहित्य तो हिसकून घेतो. ] काय तुझा संबंध ? कोण, कुठली, कधी आलीस ? आत कशी शिरलीस ?

काशी : मी रात्रीच नाही का आले ?

पाराशर : [ जवळ जाऊन चेहरा निरखून पाहतो. ] तू ती नव्हेस.

काशी : मी तीच आहे.

पाराशर : तू त्या आंधळ्या मुलाची आई आहेस ? अशक्य ! नंदादीपाच्या उजेडात पाहिला होता चेहरा, – तो काय सूर्यप्रकाशात ओळखणार नाही ?

काशी : मी त्या आंधळ्या बाळाची आई नाही. मला तुम्ही, तुम्हाला मी...आज, सूर्यनारायणाच्या साक्षीनं पहिल्यानिच पाहतोय...

पाराशर : फसवणूक ! चांडाळणी...

काशी : थांबा; वेडंवाकडं बोलू नका. तुमी सिद्धपुरुष, जीभ विटाळू नका.

पाराशर : मला शिकवते ? पापात उतरून पुण्याच्या गोष्टी करते ?

काशी : मी काडी पार केलं नाही. तुम्ही बोलावलं तेव्हा आत आले. मला काही कळत नव्हतं तरी गुहेत शिरले. तुम्ही काय करणार माहीत नव्हतं...काय केलंत ते सगळं अजून कळत नाहीये...एकच कळतंय: मला म्हणाला होतात, स्त्री म्हणून ये. स्त्री म्हणूनच आले होते मी. मी स्त्री. मी स्त्री. बाकी कशाला पुसता ?

पाराशर : तू स्त्री, मी पुरुष. फार सोपं. पण इतकं सोपं नाहीये ते...आता आठवलं, विजयेच्या धुंदीत त्या वेळी कळलं नव्हतं: नाव विचारलं तर गाव सांगितलंस !

काशी : नाही. माझं नावच काशी आहे. मी खोटं बोलले नाही ! एक अक्षर नाही ! सोंग घेऊन आले होते तरी ते जमलं नाही.

पाराशर : सोंग आणलं होतंस तर ! काली-मातेनं तर सांगितलं होतं, थोरली सून येईल म्हणून... काऽय नाव तिचं ?

काशी : अंबिका.

पाराशर : काशी नव्हे ना ! नाव विचारून घ्यायला हवं होतं. या जगात केवळ नामारूपावरून ओळखी पटतात, आत्म्याची ओळख नाही पटत सहजासहजी. तिचंच सोंग घेतलं होतंस ?

काशी : होय.

पाराशर : का ?

काशी : तिनंच सांगितलं म्हणून.

पाराशर : तिनं का सांगितलं ?

काशी : मी विचारलं नाही. मी तिची दासी ना. आजवर कधी काही विचारलं नाही, आत्ताच कशी विचारीन ? ती नुस्तं म्हणाली, बाळाच्या कल्याणासाठी माझं सोंग घेऊन जा. मला खेळ वाटला. राणी म्हणून मिरवायला निघाले. तुम्ही असे निरवायला लागलात.

पाराशर : तू विचारलं नाहीस—पण मी सांगतो... मला माहिताय्. हे माझं रूप तिला घाणलं. तिच्या सासूला फळ हवं होतं अन् त्यासाठी हिला बीज तेवढं पाहिजे होतं. ह्या स्त्रिया!– स्त्रिया कसल्या, गंधाचा सोस करणाऱ्या मधमाशा. माझ्या आईला स्वतःचा मत्स्यगंधसुद्धा नको झाला होता. मग हिला हा परक्याचा वास कसा सोसावा ? पण तू वेगळी दिसतेस. एवढं होऊन राहायला बघतेस.

काशी : मी कुठं जाणार ? काल अजाण होते, रातीत कळती झाले. पुरुष भेटलात मला. आता मी स्त्रीनं—

पाराशर : तू तिची दासी. तुझंही गाव काशी. हिच्या लग्नातच संगे आलीस काय ?

काशी : होय. आई म्हणायची, तुम्ही गाईवरच्या गोमाशा, गाय जाईल तिथं गोमाशा जायच्या.

पाराशर : आणि तरी त्या विचित्र पुरुषाशी—

काशी : [ तीव्रपणे ] कालपर्यंत कुवार होते. आज बाई झाल्ये; तुम्ही केलं. आता तुमच्यावाचून... [ त्याचे पाय धरते. तो ते सोडवून घेतो. ]

पाराशर : ऊठ. तुझा घात झाला, माझा घात झाला. [ आकाशात पाहू लागतो. ]

काशी : माझा काही घात झाला नाही. देवाघरी गेलेल्या त्या राजाची राणी म्हणून अंधारचीच माघारी गेली असते तर मात्र घात झाला असता. राणीपणाचा रंग तीन दिवस काही टिकला नसता. अन् गरीब गाई-सारख्या माझ्या अंबीताईवर जळत बसले असते. तुम्ही मला दाखवलंत माझं खरं रूप. शिव-शक्ती का काय म्हणत होतात ना !

पाराशर : शिव, शक्ती, सारे शब्द ! मुखातून येतं तितकं मनात रुजत असतं किंवा जगात उपजत असतं तर झालो असतो, मी शिव अन् तू शक्ती. शरीरधर्मासाठी साधकांनी करून घेतलेल्या या सोयी ! पण या प्रत्येक सोयीबरोबर एकेक गैरसोय पण लावलेली असते. हा पाचवा महामकार आम्ही परस्त्रीशी साजरा करायचा असतो. परस्त्रीशीच का ? तर त्या भोगात, आधी, किंवा नंतरही आसक्ती नसावी; भुक्तीतून जर मुक्तीचा मार्ग काढायचा असेल, तर भुक्तीत मन गुंतू नये... तुला

समजत नसेल हे काही. ऐक. तुझ्या दोन्ही राण्यांना मी भोग दिला – त्यातून दोन मुलं तेवढी निपजली. त्या माझ्या कोणी नव्हत, मी त्यांचा कुणी नव्हे! ती दोन मुलंसुद्धा विचित्रवीर्याच्या नावानं खपतील. निदानपक्षी कुरु वंशाच्या. तू माझी व्हायला पाहते आहेस. मला गुंतवते आहेस. हाच माझा घात!

काशी : व्हायला पाहात नाही नुसती, तुमची झालीच आहे. आता या पायांशीच राहणार आहे.

पाराशर : कशाला? काय करायला?

काशी : मी दुसरं काय करणार? खेळण्याच्या वयापासून सेवा तेवढी करायला शिकलेय. सत्ता गाजवायचं नुसतं सोंगसुद्धा घडीभर टिकलं नाही.

पाराशर : सेवा हवी असते राजाराण्यांना. सत्तेच्या भगतांना. शक्तीच्या भक्तांना नव्हे. हे चालणार नाही. माझं वाटोळं करायचंय का तुला? झालंय ते पुरं नाही झालं?

काशी : तुमचं भलंच व्हायला हवं. वाईट काही झालं नाहिये. मी तुम्हाला मुळीच गुंतवणार नाही. मलाच तेवढी बांधून घेईन. मी सांगितलं ना तुम्हाला – माझं काही वाईट झालं नाही म्हणून.

पाराशर : काशी, शाक्तानं कुमारीची पूजा करायची असते पूजा! – आद्यकुमारी शक्तीचं प्रतीक म्हणून. त्या मी तुझं कुमारीपणच नष्ट केलं. अंधारात हे काळं पाप केलं! साधनेची कुसाधना केली. विजयेच्या धुंदीत, उन्मनी व्हायचं सोडून उन्मत्त झालो. या भांगेच्या लोट्यानं उपासनेतून वासनेत लोटलं. पशुवृत्तीतून वीरवृत्तींत गेलो होतो. तिथून दिव्यवृत्तीत शिरायचा तो पशूच्या खालच्या पायरीवर गेलो. तू शक्ती नसशील, नाहीसही. पण थोर आहेस. साऱ्या साधना करून आम्ही जे साधायला पाहतो ते तुझ्याजवळ उपजत आलंय. सेवेतून आलंय का? जन्म सेवेत घालवलास, तरी पुनः सेवेला तयार आहेस. स्वार्थासाठी कुणी नरकाच्या वाटेनं धाडलं, तरी तू ऐकलंस. काळोखात कुणी अत्याचार केला तरी त्याच्या पायाशी राहायचा आग्रह तुझा. काशी, हे इतकं सारं मला अजून शिकायचंय. या एकान्त बेटावर राहून, अंगाला मळ फासून, भांगेची भांडी घशाखाली रिचवून किंवा ऐं ओं ऱ्हां ऱ्हीं करून ते जमेल असा विश्वास वाटत नाहीय. तुला रहायचं तर रहा. जायचं तर जा. मी मात्र इथून निघालो — [ काशीला कळायच्या आत तीरासारखा निघून जातो. ती हतबुद्ध होऊन पाहत राहते ]

[ पडदा. ]

# अंक तिसरा

[ राजवाड्याच्या दालनात धृतराष्ट्र, पांडू आणि विदुर ही तीन मुलं खेळत आहेत. वये आठदहाच्या आसपास. ]

विदुर : पांडू, बघू ना काय आहे ते.
पांडू : मी नाही दाखवणार, आमची गंमत आहे.
विदुर : दाखव ना, असं काय ?
पांडू : बरं, पण माझं काम केलं पाहिजेस.
विदुर : करीन की. दाखव ना.
पांडू : मी सांगेन तेव्हा. मी सांगेन ते.
विदुर : हो, करीन. आता दाखव.

[ पांडू मूठ उघडतो. एका हातानं फुलपाखराचे पंख धरतो. ]

विदुर : आ हा ! फुलपाखरू ! काय छान रंग आहेत रे.
पांडू : मग सांगितलं नाही आमची गंमत आहे म्हणून.
विदुर : माझ्याजवळ दे ना जरा वेळ.
पांडू : तसं नव्हतं हा ठरलं.
विदुर : ए, दे ना पण.
धृतराष्ट्र : [ एकटाच काही तरी करीत असतो, तो आता त्यांच्याकडे लक्ष देतो. दुरूनच. ] विदा, काय आहे रे ? माझ्याकडं आण ना.
पांडू : एहेरे. म्हणे माझ्याकडं आण ना.
विदुर : तो मलाच देत नाहिए. पांडू, दे ना.
पांडू : देतो; पण त्याला नाही दिलंस तरच... बघ, नीट धर, नाय तर देशील सोडून. [ फुलपाखरू त्याच्या हातात देतो. ]
धृतराष्ट्र : विदा, आण रे आता.
पांडू : विद्या, बघ हां त्याला दिलंस तर.
धृतराष्ट्र : विदा, आण रे. [ पांडूला ] तुझं काय जातं रे ?
पांडू : पण, तुला हवंय कशाला ते ?
धृतराष्ट्र : का ? हवंय आपलं. तुमालाच तेवढं असावं काय ?
पांडू : ठेवशील त्याचा चोळामोळा करून; धसमुसळ्या तू !

धृतराष्ट्र : नुसतं हातात घेतो, आण.

पांडू : अरे, हो रे. मोठा आलाय घेणारा. दिसणार तरी आहे का तुला काही ?

विदुर : ए, असं नको ना म्हणू त्याला. श्रुता, आणतो हां मी. [ त्याच्याकडं जाऊ लागतो. ] पांडू, हे सुटायला बघतंय. तडफडतंय वाटतं रे !

पांडू : माझं आहे ते. सोडू नको. बघ. धरता येत नव्हतं तर घ्यावं कशाला ? [ त्याच्याकडं धावतो. तेवढ्यात फुलपाखरू सुटून जातं. पांडू येऊन विदुराचा कान धरतो. तो वेडंवाकडं तोंड करतो. ] पुन्हा ये मागायला काही. [ कान सोडतो. विदुर कान चोळीत धृतराष्ट्राकडं जातो. तो उठत असतो. ]

विदुर : बस आता. ते गेलं उडून. [ त्याच्या हाताला धरतो. ]

धृतराष्ट्र : मला नाही बसायचं. काही तरी खेळू या आपण.

विदुर : काय खेळायचं ? अंगण-रिंगण खेळू या का ?

पांडू : [ त्यांच्या जवळ येत ] मी सांगू का अगदी सोप्पा खेळ ?

धृतराष्ट्र : सांग.

विदुर : तिघांनाही खेळता आला पाहिजे हां.

पांडू : तिघांनाही खेळता येईल. राज्य श्रुत्यानं घेतलं पाहिजे.

धृतराष्ट्र : मी घेतो राज्य. सांग.

पांडू : आपण ना, आंधळी कोशिंबीर खेळू.
[ धृतराष्ट्र आवाजाच्या रोखानं एक सणसणीत चापट त्याला ठेवून देतो. ]

धृतराष्ट्र : पुन्हा माझ्या आंधळेपणाचं बोल, मानच मोडीन तुझी.

पांडू : [ दूर जाऊन ] बोलीन जा. खरं बोलायला काय भीती आहे ? चल विद्या, विटी-दांडू आण जा.

विदुर : का रे चिडवीत असतोस श्रुताला ? मी नाही येणार तुझ्याबरोबर, जा.

पांडू : फुलपाखरू घेताना काय म्हणाला होतास. विसरला वाटतं ?

विदुर : पण खेळायचं काय काम असतं का ?

पांडू : मला खेळायचं नाईच आहे. विटी-दांडू नुसता घेऊन ये जा.

धृतराष्ट्र : काही नको जाऊ, विदा. [ पांडूला ] तो काय चाकर आहे तुझा ?

पांडू : आहे आहे जा.
[ एवढ्यात काशी आत येते. तिच्या हातात मधे मांडायचा पडदा. ]

काशी : चलाऽ बाळमंडळी बाहेर चला. महाराज येतायत, पाहुणे येतायत. [ पडदा मांडते. ]

धृतराष्ट्र : काशी, कोण ग येतंय ?

काशी : गंगेयमहाराज येतायत.
पांडू : अन् पाहुणे कोण ग ?
काशी : मोऽठे पंडित आहेत. वेदव्यास त्यांचं नाव.
पांडू : पंडित म्हणजे कोण ग ?
विदुर : अरे, पंडित ना ? त्यांना सगळं कळतं. हो ना ग काशी ?
धृतराष्ट्र : पण ते कशाला येतायत ग ?
काशी : तुमच्या मुंजी करायच्या आता. तुम्हाला विद्या शिकायची ना !
विदुर : मग मी पण पंडित होईन हां.
पांडू : ए तुझी कोण मुंज करतंय !
विदुर : करायची ना ग काशी ?
काशी : [चेहरा उतरतो. डोळे भरून येतात. ते जिरवण्यासाठी ती त्याला नकाराची मान हालवते.] चला बघू आता. चौकात खेळा. आले बघा महाराज. [काशी आणि मुले निघून जातात. पडद्यात भीष्म आणि व्यास यांचा आवाज येतो. भीष्म सांगत असतो, 'ही कुरुवंशाची वास्तू.' एवढ्यात ते प्रवेश करतात.]
भीष्म : यावं, वेदमूर्ती. आपल्या पावलांनी आज ही वास्तू पवित्र झाली.
व्यास : [हसतो.] भीष्मराज, माझ्या पावलांनी भूमी पवित्र होत असेल तर बहुतेक आर्यावर्त आता पवित्रच झाला म्हणायचा.
भीष्म : इथं प्रथमच येत आहात...
व्यास : असं असं. म्हणजे, पहिलं पाऊल ते पवित्र; पुढची आपली चालायची. तुमच्या दृष्टीनं हे सुसंगतच–
भीष्म : म्हणजे कसं ?
व्यास : तुमचं नाही का, पहिली प्रतिज्ञा तेवढं बोलणं. नंतरचं जीवन म्हणजे त्याचा केवळ पडसाद !
भीष्म : म्हणजे ते वायाच गेलं असं आपल्याला वाटतं. सामान्य जनांना तरी वेगळं काय वाटणार मग ?
व्यास : सामान्यजनांना वेगळंच वाटतं. ते म्हणतात प्रतिज्ञा हे भीष्मांचं थोडं गंजलेलं शस्त्र आहे. त्याची धार जरा गेलेली असली तरी राजकुलाला त्यांचा धाक आहे.
भीष्म : आणि त्या धाकाच्या समाधानानंच तो प्रतिज्ञेचं सोंग पुढं चालवीत आहे, नाही का ?
व्यास : अनर्थक अर्थ काढण्यात सामान्यजनांचं तोंड कोण धरणार ?
भीष्म : आणि अनर्थांना तोंड द्यायचं दायित्व आपल्यावर नसतं तर त्या अर्थांची तरी कोण पर्वा करतो ? वेदमूर्तींचाही समज तसाच

असला तर मात्र –

व्यास : घटकाभर समजा, तसा आहे. मग काय म्हणणं त्यावर तुमचं ?

भीष्म : ऐका... पण नको. असल्या गोष्टींच्या उच्चाराची वाफही आचरणाच्या आदर्शाला मलिन करून टाकील. नकोच.

व्यास : वाचेच्या वाफाऱ्यातसुद्धा शक्तीचा साक्षात्कार घडवणारे भीष्म असंच म्हणणार. पण आचरणाचे आदर्श मूढांच्या प्रलापांनी धुकेजत असले तर फुंकर मारायचा निषेध नाही.

भीष्म : वेदमूर्ती, अनेकांना वाटतं की मी राजपदाचा मुकुट फेकून प्रतिज्ञेचा टोप चढवला तरी सत्तेचा दंड मात्र हातातच ठेवला. धाकाचं प्रकरण असंच. त्या पहिल्या हिरव्या काळात प्रतिज्ञेचा परिणाम मलाही भासायचा, तो माझे भाऊ आणि माता माझं ऐकत यातूनच. पण ते काही सर्वकाळ खरं नव्हतं. त्यांच्या त्यांच्या प्रवृत्तीशी जुळत नसेल तेव्हा काही ते माझ्या धाकाला भीक घालीत नसत. चित्रांगदाला मी सांगत होतो, 'या मायावी गंधर्वाच्या नादी लागू नकोस. त्याच्याशी संधी कर.' तो म्हणाला, 'दादा, पराक्रमाचा मक्ता काय तुम्हालाच दिला आहे ?' मी गप्प राहिलो. आपलं नाव खरं करण्याच्या नादात त्यानं कुळाचं नाव मात्र घालवून टाकलं ! विचित्रवीर्याचं काही वेगळं नव्हतं. त्याला पराक्रमही नव्हता...

व्यास : मोठ्या झाडाच्या सावलीला वाढणारी रोपं –

भीष्म : वेदमूर्ती, क्षमा करावी – पण इथं चुकलात. मोठ्या झाडाच्या निवाऱ्यामुळं ती रोपं वादळी वाऱ्यांपासून वाचली, आपल्या मुळांवर उभी राहिली. पण दुर्दैवानं ती वटवृक्षाची नव्हती ! परशुरामांनी हस्तिनापुरावर चाल केली तेव्हा थरथरा कापत येऊन माझी भाकणूक करणारा विचित्रवीर्य ! पुढं एकदा मी त्याला म्हटलं, 'बाळा, राजानं स्त्रियांच्या सहवासात इतका काळ घालवू नये ' तर तो काय म्हणाला असेल कल्पना करा ! म्हणाला, 'दादा, त्या दोघी, पळवून तुम्ही आणल्या असल्या तरी बायका माझ्या आहेत, विसरू नका.'

व्यास : तरी त्या बिचाऱ्यांना, तो पुत्र काही देऊ शकला नाही ! [ मुलांचा ओरडा होतो म्हणून त्यांचं बोलणं थोडं थांबतं. तेवढ्यात पांडू खिडकीवर चढून आत डोकावतो. भीष्म त्याला जायला खुणावतो. मग व्यास आणि भीष्म दोघेही खिडकीकडे जातात. ]

व्यास : हेच ना ते ?

भीष्म : होय, हेच.

व्यास : नियोगानं झाले, – असं ऐकतो.

भीष्म : होय वेदमूर्ती. हेच आता कुरुवंशाचे अंकुर. हा उंच आणि सशक्त आहे तो थोरलीचा, थोरला. धृतराष्ट्र त्याचं नाव. डोळे नेटके असूनही आंधळा आहे. तो पांढुरक्या वर्णाचा, आता डोकावत होता– तो पांडू. धाकटीचा. तुम्ही ज्यांना उपनयनसंस्कार करणार आहात ते हे दोन्ने राजपुत्र !

व्यास : अन् तो तिसरा ?

भीष्म : तो विदुर. दासीचा. पारशवच म्हणायचा.

व्यास : सरळ सूतच का नाही ?

भीष्म : तीही एक कथाच आहे. वेदमूर्ती, या तिन्ही मुलांचा जन्मदाता एकच होता, ब्राह्मण होता. पाराशर त्याचं नांव.

व्यास : अस्सं ! हा विदुर चांगला गोरागोमटा दिसतो.
[ पडद्यात काशीचा आवाज. 'आता चला हं. माताजी येतायत'. व्यासाच्या चेहऱ्यात क्षणिक बदल ]

भीष्म : तोही एक चमत्कारच. स्वभावधर्मानं पाहाल, तर हा सगळ्यात शांत अन् सरळ. हा पांडू दुबळा असला तरी अभिमानी आणि कळीचा. तो धृतराष्ट्र डोळयांत गेलेला म्हणून चिडका, तापट आणि बलदंड मात्र आहे.

व्यास : सत्व–रज–तम या त्रिगुणांचीच जणू ही मानवी रूपं नाही ? मात्र रज तम क्षत्रियांच्या वाट्याला आलं आणि सत्त्व पारशव झालं ! त्याच्या उपनयनाची भानगड नसणारच. मला वाटतं त्याला उपनयनाची गरजही नाही.
[ ते दोघे काही वेळ मुलांच्याच दिशेनं बघत राहतात. इकडे, काहीशी विचारात असलेली सत्यवती दालनाच्या दुसऱ्या भागात प्रवेश करीत असते. तिच्यामागे चोरपावलांनी मावशी पण. सत्यवती अचानक मागं पाहते. मग त्या आपसांतच दबल्या आवाजात बोलतात. ]

सत्यवती : मावशी ?

मावशी : मीच आली बया. काशीनं सांगितलं. म्हनलं, म्हनत्यात बुवा त बघुन तरी घ्यावा. तेवढंच दोन सब्द कानावरनं जात्याल.

सत्यवती : [ नाराजीनं ] बऽरं बस.

मावशी : अग म्या तर त्या तिघींलाबी म्हनलं या म्हनून.

सत्यवती : [ रागानं ] बरं केलंस. पोरांला नाय ना आनलंस ?

मावशी : ती ग कशाला ? बाप्यावानी बघत्याल चांगली. त्यांच्या आयांचंच हुकलं असतं. तुमचा पडदा पडला ना आडवा ! या गऽ या गऽ बायक नं बघु नका आयका !

सत्यवती : बरं बाई. गप तरी बस आता.
[ दोघी पुढं येऊन बसतात. त्यांच्या पावलांचा आवाज ऐकून भीष्म पडद्याकडं नजर वळवतो. ]

सत्यवती : गंगेया,...

भीष्म : माते, वंदन करतो.

सत्यवती : गंगेया, वेदव्यास आलेत ना?

भीष्म : होय माते; बरोबरच घेऊन आलो.

सत्यवती : वेदमूर्ती, अनुग्रह असावा.

व्यास : माते, या बालकावर तुझाच अनुग्रह असावा.
[ अंबिका, अंबालिका आणि काशी हळूच येऊन उभ्या राहतात.]

सत्यवती : नाही, वेदमूर्ती. तेजस्वी ब्राह्मणांचा या वंशावरच अनुग्रह रहात आलेला आहे. आता ज्या कुमारांना तुम्ही दुसरा जन्म द्यायला आला आहात त्यांना पहिला जन्मच मुळी पाराशरांनी दिला.

व्यास : पाहिले मी त्यांना. त्यांची त्रिविध रूपं पाहून क्षणभर वाटलं – भीष्मराज, क्षमा करा... क्षणभर वाटलं... आपली प्रतिज्ञा काही काळ बाजूला ठेवून पाराशराऐवजी भीष्म नियोगी असते तर यांच्या आकृती वेगळ्या झाल्या असत्या. [ अंबिका अंबालिका चमकतात. ]

भीष्म : आणि भीष्माच्या विकृती लोकांना चिरकाल चघळायला पुरल्या असत्या.

सत्यवती : वेदमूर्ती, माझंही मत तुमच्यासारखंच होतं. पण यांनी ते ऐकलं नाही. तुम्हीच निवाडा करावा. शान्तनूंच्या वंशाचं पालन करण्याच्या आपल्या वचनाला देवव्रत भीष्म चुकले की नाही?

व्यास : बोला भीष्मराज!

भीष्म : वेदमूर्ती, आर्यावर्तात असंख्य क्षत्रिय आहेत. लहानमोठे राजेही पणाचे पासरी पडलेले आहेत. तेही तोंडाला येईल तशा प्रतिज्ञा करतात, पाळतात किंवा बहुधा मोडतात. त्यांना कधी कोणी त्यांच्या प्रतिज्ञांचे आशय किंवा वचनांचे विषय यावरून छेडल्याचं माझ्या ऐकण्यात नाही. एखाद्या वचनानं स्वतःला जगाच्या व्यवहारापासून दूर ठेवणाऱ्या मला मात्र वारंवार सारं स्पष्ट करीत बसावं लागतं ते का?

व्यास : असामान्यतेचं हे सामान्य मूल्य आहे.

भीष्म : असं असेल तर ते एकदा चुकतंच करू दे! ऐका वेदमूर्ती. माते, ऐक. कुणीही समजून घेत नाही ते हे की माझं वचन, माझी प्रतिज्ञा हा केवळ माझे वडील आणि मी यांच्यापुरता एक पवित्र व्यवहार

होता. माझ्या वडिलांना ते खरं आणि पुरं कळलेलं होतं. म्हणून तर इच्छामरणाचा अपूर्व वर त्यांनी मला दिला.

व्यास : परेच्छेनं ज्यांचं जीवन त्यांना स्वेच्छेनं केवळ मरणच मिळणार !

भीष्म : ' मृत्यूतून मला अमृताकडे ने ' अशी प्रार्थना करणारे वेदमूर्तीच असं बोलतात याचं नवल वाटतं. पहा. जीवनाच्या नदीचे जन्म आणि मरण हे दोन काठ आहेत. पहिल्यावर माझी सत्ता नव्हती. दुसऱ्यावर ती माझी बसवून पिताश्रींनी मला स्वेच्छेचं जीवनच दिलं !

सत्यवती : मग त्यांनाच प्रिय असलेली बायको, मुलं, राज्य, प्रजा तुझी कोणीच नव्हत ?

भीष्म : कोणीही नव्हत. जिनं नऊ महिने भार वागवला ती माता गंगासुद्धा माझी कोणी नव्हे. मी तिचा होतो हे खरं. ती सगळ्याच आठही मुलांची आठ दिशांना वाट लावायला निघाली होती. तिनं दिलेलं जीवन हे तिच्या इच्छेनं भोगण्याचं मरणच होतं. वडिलांचा तिच्यावर इतका जीव, की सात मुलांच्या ताटातुटीचं दुःखसुद्धा त्यांनी तिच्यासाठी सोसलं. माझ्यासाठी मात्र त्यांनी तिचासुद्धा त्याग केला. नुसता जन्म घेऊन आलेल्या मला जन्मभराचं जीवन उपलब्ध करून दिलं...म्हणून माझी प्रतिज्ञा ही केवळ कृतज्ञता होती; एकमार्गी, एकदर्शी कृतज्ञता होती. तिच्यापुढं इतर सर्व शून्यप्राय होतं. तिच्या पालनात परिणामांचा विचार नव्हता; जगाची चिंता नव्हती. जीवन पिताश्रींनी दिलेलं, ते त्यांच्या चरणी वाहिलं होतं. त्यानंतर ते माझं असं राहिलं नव्हतं. म्हणून ते अधिकाधिक शुद्ध ठेवणं हे माझं कर्तव्य होतं. तेवढंच मी करीत आलो.

व्यास : याचा अर्थ असा की, तुमचं आत्मिक जीवन आणि लौकिक जीवन यांच्या मधोमध एक भिंत उभी राहिली.

सत्यवती : आम्ही मात्र समजत राहिलो की हा पडदा केवळ ब्रह्मचारी व्रत पाळण्यासाठी.

व्यास : पडदा ? [ इकडेतिकडे पाहतो. ] तरीच. एवढा वेळ मला कळलं नाही की शब्द कानी येतात आणि माणसं कशी दिसत नाहीत. वाटलं, हा कुळाचार असेल.

भीष्म : कुळाचार इतका कडक नाही. पण नावेला पात्रात घालण्याआधी सारे दोर सपासप तोडण्याच्या त्या तरुण वयात हा एक नेम माझा मीच लावून टाकला.

व्यास : जणू काही त्या नावेचं हे वारा भरलेलं शीडच होतं ! भीष्मा, तुम्ही तेव्हा दोर तोडलेत, मी आता हे शीड गुंडाळतो.

[ संथपणे मधला पडदा उचलून भिंतीला लावतो. सत्यवती आणि मावशी लगबगीनं उठतात. त्या तिघी तरुण स्त्रियाही गडबडतात. अंबिका-अंबालिका भीष्माकडं बघून घेतात. काशी पडदा उचलणाऱ्या व्यासाला मदत करायला पुढं होते. थबकते. ]

काशी : महाराज! [ क्षणभर मान खाली घालून उभी राहते. तेवढ्यात सत्यवती व्यासाकडं निरखून पाहते. ]

सत्यवती : क्रिष्णा – [ जीभ चावते. ]

मावशी : काले, तुझ्या –

काशी : महाराज,

सत्यवती : क्रिष्णा, अरे तूच का वेदमूर्ती होऊन आलायस? इतका वेळ ओळखलंसुद्धा नाही!

व्यास : माते, ओळखी पटणं तसं कठीणच असतं. भीष्मराज, इतक्या वर्षांत पहिल्यांदाच गोंधळल्यासारखे दिसताय!

भीष्म : गोंधळलो नाही. थक्क झालोय. माझ्यापुरता मी काळ थांबवला होता. इतरांच्याही विषयात तो तसाच थांबला असेल असं चुकीनं कल्पीत होतो. ही दाशराजाची कन्या किंवा त्या काशिराजाच्या कन्या–काळानं किती वेगळ्या करून टाकल्या आहेत, कळलं नव्हतं. ओळखी पटणं खरंच कठीण.

मावशी : काशे, तुझ्या वळखीचे का ग हे?

काशी : मावशी, हेच ते पाराशर!

भीष्म : द्वैपायन पाराशर? आणि तेच वेदमूर्ती व्यास? काळानं तुम्हालासुद्धा इतकं वेगळं केलं काय? आजचा दिवस थक्क करण्यासाठीच उगवला का काय?

मावशी : ही म्हणते पाराशर–मंग काले, तूच काय ग क्रिष्ना म्हनलीस? योक देही अन नावंच लई! अन् काय ग, तुम्ही त्याला वळाखला मंग ह्या दूघी गप कशा?

सत्यवती : मावशी, मावशी, अग दमानं जरा! या गंगेयाला कधी पाह्यला नव्हतास त्याला तरी बघून घे.

मावशी : मोटं कौतिक लेकाचं...

व्यास : होय ना आजी? म्हणून तर तिनं माझं कौतिक केलं.

सत्यवती : क्रिष्णा–

व्यास : माते, आता कशाला घसा शिणवतेस? सत्य एका तोंडानं लपवलं तर दहा तोंडांनी बाहेर पडतं. तेच सरळ पुढं आलं तर उघडं नागडं

असलं तरी कुणाला धक्का बसत नाही त्याचा. ऐका आजी… ही माझी आई !

मावशी : काले, सत्येवती ना ग तू. सत्ये म्हणतेस हे ? काय केलं हुतंस ? इतक्या दिवस गप कशी बसलीस ?

सत्यवती : ऐक मावशी, सत्यच सांगते. नुसतं नाव ऐकलंस तर इतकी पूसतपास, त्या वेळेला सांगितलं असतं तर शिंगाड्यावानी भाजून खाल्लं असतंस का ग मला ? सगळीच ऐका आता. गंगेया, तुला सांगते. अम्बी, काशी, तुम्हांला अर्धमुर्ध माहिती आहे, आता सारं पुरतं माहिती करून घ्या. माझा दिवस आता मावळायला आला आहे. आता सगळ्याचा झाडा तुमच्यासमोर देऊन टाकते. अंबाली, आता रागवू नकोस, चिडू नकोस. ऐक. मावशे, आपल्या घरी मी नाव चालवायचे तेव्हा एकदा हरवले होते ना दोन वर्सं–

मावशी : तव्हाची कमाई काय ग ही ? मैना आली पनात तिला राघू भेटला बनात ! कोन ग ?

सत्यवती : ह्याचे वडील. पराशर त्यांचं नाव. फार लांबवीत नाही. त्यांचं माझ्यावर मन गेलं. लखलख उन्हात त्यांनी आभाळ अंधारून आणलं; कस्तुरीनं माझा वास घालवला. कालीच्या पात्रात पानी वरसलं. झिणझिण्या उतरल्यावर मी कष्टी झाले. मला म्हणाले, ‘ काळजी करू नकोस. पहिल्यासारखी करून पाठवीन.’ नऊ महिन्यांनी हा झाला. वर्सभर त्या गुहेत राहिल्ये; मग म्हणाले, ‘ परत जा. मी सारखा इथून तिथं फिरणारा. तुला झेपायचं नाही ! ’

मावशी : अन म्हनून एकटी माघारी आलीस ? लेकराला मागं ठिवून ? अग काले, अशी कशी आई तरी तू ? ग्या केलं असतं त्याचं गूमूत, दूध-पानी ग !

व्यास : जाऊ द्या आजी. आता खूप मोठा झालो मी !

सत्यवती : मावशे, मी काही गप राहिले नाय. पण मला म्हणाले, ‘ लक्षात ठेव. मुलगा बापाचा असतो. घेऊन गेलीस तर तुझ्या मागं येईन. तुझ्या बापाला मागीन. त्यानंही नाही दिला तर – ही बघ राखेची चिमूट. तळहातावरून एका फुंकरीनं उडवीन तर तुझ्या वाड्याची राख करून टाकीन. ’ पहिला चमत्कार मी विसरले नव्हते. म्हणून मी भ्याले मावशी !

व्यास : पण तुला कुणीच काही कसं पुसलं नाही ?

मावशी : अरं बाबा, ही अशी नाहिशी झाली न् परत आली ह्याचंच अप्रुग

झालं सगळ्यांला. मगरीच्या दाढंत घुगरी गेली तीच जनू काय माघारी आली !

सत्यवती : गंगेया, त्याचा सूड तुझ्यावर निघाला. तुझ्या वडलांनी मागणी घातली तेव्हाच सारं पक्कं करून घेतलं. सख्ख्या लेकावरून शिकले ते सावत्र लेकावर डागलं. हट्ट केला – घट्ट धरला – तडीला नेला. पण मला कायमचाच शाप आहे. मुलगेच्च गेले माझे. पुन्हा तुझी मनधरणी करायला आल्ये तरी मनात भीती होती, की कदाचित ऐकशील अन् माझ्या पुत्राच्या नावानं पुन्हा गंगेचाच वंश माझ्या नाकावर टिच्चून या राज्याचा वारस होईल. मग मला वाटलं असतं, कोकिळेनं घरट्यात अंडं न ठेवताच कावळीला फसवलं ! पण क्रिष्णा, हा फार मोठा आहे. माझ्यासारखा शब्दांचे खेळ करून इतरांना चकवणारा नाही; तो तयार झाला नाही. तुलाही दीरच मानला या पोरींचा अन बोलवायला आल्ये. पुढचं आता साऱ्यांना ठावकीच आहे.

अंबालिका : पार फसल्यावर ठावकी झालं. आधी माहिती असतं तर हे सारं ऐकायला उरलेच नसते. तेव्हासुद्धा देह द्यायला लावलात तरी मन नव्हतं दिलं. ते जळजळीत तापल्या गोळ्यासारखंच होतं : पोटी आलेल्या त्या पांढऱ्या गोळ्यानं निववलं.

सत्यवती : मला ठाऊक आहे. मी मात्र आईला अन बाईलाही न शोभेलसं वागत आले. मी पूजा केली प्रतिष्ठेची, वैभवाची, सत्तेची, पौरुषाची. ज्यात काही व्यंग, दुबळेपण आहे – जगाच्या दृष्टीनं – ते काही मला भावत नव्हतं. श्रुता आंधळा जन्मला तर माझी तळमळ झाली. राज्याला राजा आंधळा मिळाला यापेक्षा सत्यवतीचा नातू असला झाला असं जे लोक म्हणतील त्याची मला बोच होती. अम्बी तरी माझं ऐकेल म्हणून तिला पुन्हा सांगायला गेले – पण तीही आई होती हे विसरले.

अंबिका : माताजी, आईचं प्रेम मोठं खरं– पण त्यानंच मला खोटं वागायला की हो शिकवलं !

मावशी : काले, अग लहानपनी कशी अन मोठ्यापनी ही अशी ! लगिन होईस्तवर दासबाबा किती नावजायचा तुला. म्हनायचा, खरी राजाची लेक – बोलन्याचालन्यात अगदी नेक. अन काय ग ह्या भानगडी ! वरून मऊसूद अन आत काट्यांची बुदबूद !

सत्यवती : बोल मावशी. कान उपट अन हातात दे. पण लहानपणचं उलाणं देऊ

नकोस. एक दिवस, खेळताना कुणीतरी पोर म्हणालं– ' आईबापाचा तरी पत्ता हाये का ? ' अन त्या वेळेपासून, पाण्यात बुडलेल्या वाळू-सारखी वेगळी झाले मी. बाबानं सांगितलं, ' बाई, तू उपरिचर राजाची मुलगी आहेस ! ' मंजे मी मोठी ना ! मग माझी वागणूकच बदलली. पाण्याच्या घोटागणिक खोटं बोलणाऱ्या त्या पोरांच्यात सदा खरं बोलणारी मी सत्यवती झाले !

**मावशी** : आपलं आपुन मोटं, जग म्हनतं नाटं ! तू मस होतीस राजाची लेक ! दासबाबानं एक दोघांला पुसलं तुझ्याबद्दली– तर ते म्हनले, माशाच्या पाटीत वहात आली ती आम्हांला देतोस, भाजून खायची का रे ?

**सत्यवती** : मग सांग मावशी, मीच माझ्या मोठेपणासाठी झटले तर काय चुकलं माझं ?

**व्यास** : भीष्मा, आता तुम्हीच निवाडा करा !

**भीष्म** : पाराशरा, कृष्णद्वैपायना, वेदव्यासा, तुमच्या कृपेनं माणसातलं अर्धं विश्व आज डोळ्यांनी पाहिलं. पण डोळ्यांनी पाहिलं त्यापेक्षाही कानांनी ऐकलं ते एकाहून एक अचंबा वाढवणारं होतं ! मी पामर काय निवाडा करणार ?

**व्यास** : थांबा भीष्मराज. तुम्हांला नव्यानं दिसलेल्या अर्ध्या विश्वातली एक उल्का तुम्ही अजून पाहिलीच नाहीत. काशी, या सगळ्या खेळात तुझाही वाटा मोठा आहे. आता तू बोल.

**काशी** : महाराज, मी सांगायचं ते तुम्हालाच सारं माहीत आहे.

**व्यास** : शूद्र आणि त्यातून स्त्री ! ती बोलणार नाही हे ठाऊकच होतं. तिच्यासाठी मलाच बोललं पाहिजे...

[ अंधार पडत जातो. गावरान वाद्यांचं पार्श्वसंगीत चालू होतं. हळूहळू त्याची लय वाढते. आवाज मोठा होतो. काळोखात विझायला आलेली शेकोटी आधी दिसते. मग पहिल्या प्रवेशातली सारी माणसं हळूहळू ठळक होतात. ' बाबा आलाऽ ' म्हणणारं पोर डोळे चोळीत झोपेतून उठतं. त्याची आई, त्यानं गडबड करू नये म्हणून काळजी घेते. ]

**पोर** : [ आळोखेपिळोखे देत ] आये, झाली का ग कथा ? [ त्याची आई त्याला गप्प बसवण्याचा प्रयत्न करते. ]

**सूत** : नाही लेकरा... अरे, कथा इथं सुरू झाली. जराऽ धीर धरा मंडळी, आजची कथा शेवटाला आली, पण तिची शेवटासुनि सुरुवात झाली... आठवा काय म्हणाली होती काली–

जालंधर : अरं तूच सांग... आता नको आठवायला लावू. आन् त्यो मुडदा कसा आला बोल.

सूत : सांगतो, ऐका. म्हणाली होती सत्यवती काली, की गंगेची गंगोत्री आटली अन कुरुवंशाची दोरी तुटली. ती स्वता सांधायला उठली, इरेसरीनं झटली, आणि–म्हटलं तऽर तिची हौस पुरती फिटली. एकाच्या जागी तीऽन, मुलगे तिच्या मुलग्यानं, दिले आईस मिळवूनऽ त्यात कथा दोघांची, – आंधळ्याची पांढऱ्याची, म्हणजे धृताची अन पांडूची, ती कुरूंच्या वंशाची, अहो नाशाची नाशाची! तर, लांबवु नाही फार, सांगतो नुसते मी सार, त्यात बरं का जालंधरऽ, तुला देतो मी उत्तर : कुठल्या आया कुठला बापया– तरी ते दोघे राजाचेऽ पूतऽ, व्यास आले त्यांच्या मुंजीत, गंगेया राहिला त्यांना संभाळीत, सगळे संतोषी हो मनात! अहो, धृता पांडू जोडीने, वाढले केसाकेसाने, लेकरांचे झाले तरणे, त्यांच्या लग्नाची तोरणे, बांधली पुन्हा–गंगेयाने! आणि गंगा जी होती आटली, ती पुन्हा भरून दाटली; खरं वाटायचं नाहि तुम्हाला, पाच लेक झाले पांडूला, अन् पक्के शंभर ते धृताला–

पोर : आय्यो! अन् भांडनं नाही व्हायची इतक्यांची?

एकजण : ऐक रे–मधि नको वटवट करू.

सूत : शाबास, लेकरा शाबास! तू खरा शहाणा-कारण पोटात नाही बहाणा! अरे, भल्याभल्यांना नाही समजलं ते तुला झटक्यात उमजलं. ता म्हणता तुला ताकभात कळलं! दोघांचंदिखील जमत नाही, मग एकशेपाचांची कथा काई, मान असतो ज्याचा त्याचा, लोभ असतो ह्याचा त्याचा, वर मनातला ताठा; मग गाईगुरांचा गोठा, राज्याचा वाटा, काहीही पुरतं, भांडण चालू राहतं; कुणाला न्याय, कुणाचा अन्याय; कोणी वनवासी कोणी सुखवासी – अन झालं काय शेवटासी– त्यांनी जमा केले सर्वासी – लढाई खेळण्यासी; झाली वाटतं वाताहात, तेच तेच, जालंधर, तेच आले मुडदे वाहात!

साधू : [ सुस्कारा टाकतो. ]

जालंधर : मंजी आता महिनाभर जायला नको मासं धरायला! अरं भारुड्या, भांडान कुनाचं न् वनवास कुनाला!

एकजण : पन काय वो, एवढं मोठं भांडान कुनी मिटावलं कसं नाही?

दुसरा : नाही मंजे, कोळनीचाच वौंश हा–तरी ही पोरं अशी कशी निघाली?

तिसरा : आन् त्या काशीचा ल्योक, काय त्याचं नाव–त्याचं काय झालं रे?

वाई : त्या काशीचंबी पुसा कि कुनि तरी !

साधू : बाई, ते ह्या सूतालासुद्धा माहीत नाहीये. तो खूप महाभारूड सांगेल पण त्यातसुद्धा तिचं नावनिशाणच राहिलं तर राहील. तूच सांग बाई – लेकरू वाढतं, मोठं होतं; नाळेची आठवण कोण ठेवतं ? ताडमाड झाड दिसतं, त्याच्या नखभर बियाचं कोण पुसतं ? वणवा किती पसरतो – बघणार ठिणगी विसरतो. बाई, ती काशी ठिणगी झाली अन् पाराशराला पेटवून गेली. सांगण्यासारखी गोष्ट आहे, पण जाऊ द्या !

अनेकजण : सांगा सांगा...

साधू : मंडळी, चंद्र कलायला आला, तुमचा रस्सा गार होऊन गेला. रात जागवायचीय का ?

अनेकजण : होय होय, सांगा.

साधू : ऐका तर. हीच होती त्या कृष्णाची गुहा. ह्या इथंच उभी होती ती काशी, जेव्हा तिरिमिरीसरशी, निघून गेला तो कृष्णा ! मागं राहिली जी काशी– ती होती नुसती अंबिकेची दासी. पण त्याच्या मनात जी का रुतली ती होती अगदीच वेगळी ! त्याला कळलं, अरे, एका अश्राप मुलीचा मी नाश केला. कालीच्या भक्तीसाठी एका अज्ञान जिवाचं बोनं झालं. त्याला ही जागा नको झाली, ही सेवा नको झाली – तोंड झाकून पळून जावं असं वाटलं त्याला अन तो कृष्ण पाराशर...निघून गेला.

सूत : पण कुठं गेला ? अन् वेदव्यास होऊन परत कसा आला ?

साधू : तो निघून गेला. मस्तक बधिर झालं होतं त्याचं, पाय भराभरा चालत होते त्याचे. ह्या नदीच्या काठावरून त्या नदीच्या काठाला, नव्या नव्या देशाला जात राहिला सारखा. शोधीत राहिला की देवाधर्माचा आणखी काय मार्ग आहे ? अखेरीला पोचला व्यास नदीच्या काठाला. त्या लोकांची वेगळीच चाल. अशी आपल्या शेकोटीसारखी कुंडं करतात. त्यांच्यातले शहाणे लोक चहूबाजूला उभे राहतात. सुरावर मंत्र म्हणतात – मग तेल तूप, दूध दही, भात खीर, मेंढा बोकड त्या अग्नीला वाहतात. त्याला यज्ञ म्हणतात.

एकजण : ते तसलं एकदा पाहिलं होतं भ्या. समदं आपल्यावानीच. पन ते घरातल्या बाईमानसाचं न घोड्याचं करायचे ति वंगाळ काय वो बाबा ?

साधू : यज्ञातलाच एक भाग ! अश्वमेध यज्ञ म्हणतात त्याला. तर मी काय सांगत होतो – हा पाराशर कृष्ण त्यांच्यात राहिला अन् देवदेवतांना आळवायला लागला. त्यांचे सारे मंत्र भराभर शिकला अन् त्यांनाच

शिकवायला लागला. सगळे मंत्र गोळा करून त्यानं त्यांचे चार वेद केले. मग हे वेद ज्याचे त्याला नेमून दिले. म्हणाला गड्यांनो, हे मंत्र गा, देवांना राजी ठेवा अन् कल्याण करून घ्या! म्हणून तो झाला वेदव्यास. पण पुढं काय झालं? त्याच्या चेल्यांच्यातच भांडणं व्हायला लागली. एक म्हणतो, 'हा माझा वेद, मी म्हणणार', दुसरा म्हणतो, 'नाही, मी म्हणणार.' अन् त्यात हेतू काय? तर 'याची दक्षणा मी घेणार!'

एक : हात तुमची! देवाधर्माच्या कामात पैशा-अडक्यासाठी लोचाटपणा!

साधू : ते तर झालंच! वर मंत्राचाच बडेजाव वाढला. मंत्र म्हणणाराचा वाढला. ते मोठे डोक्याचे मानायला लागले स्वतःला. बाकीच्यांना लागले हाडुतहुडुत करायला. दुसऱ्या कुणाला म्हणू देईनात. नुसतं कानांनी ऐकूसुद्धा देईनात. तो वेदव्यास वैतागला. पुन्हा त्याच्या पायाला चाकं लागली. हस्तिनापुराला त्यातच आला.

सूत : आपल्या मुलांची मुंज करून त्यांना वेद शिकवायला, होय ना?

साधू : अरे, तो आलाच अनायासं म्हणून भीष्मानं आणलं त्याला मुंजीला. त्यातही तिढा आलाच ना! धृता-पांडूंची मुंज व्हायची तर काशीचा विदुर हिरमुसला. व्यासाच्या पोटात कालवलं. त्यानं विदुराला सांगितलं: 'मुला, त्या दोघांना मी जानवं दिलं, तुला ज्ञान देतो. अरे, त्यांना वेदातलं सांगितलं: खरे बोला, धर्म चाला, आचार्यदेवो व्हा... म्हणजे काय, काही तरी वेगळं व्हा. तुला सांगतो ते ऐक: खरे बोला, धर्म चाला, मनुष्यदेवो व्हा. माणसातला माणूस हो. हे चारी वेदांत नाहीए. पण तुझ्यासाठी, तुझ्या आईसाठी, अन तुमच्यासारख्या सगळ्यांसाठी मी आता पाचवाच वेद रचतो.'

एकजण : हे बरं की! मंग रचला म्हनता त्यानं?

साधू : रचला! कवन केलं त्यानं. कवनाला चालसुद्धा निराळी लावली. बायकापोरांना, येड्याभाबड्यालादिखील म्हणता यावी. अन म्हणाला, कथासुद्धा देवदेवतांची नको. माणसांची सांगतो. म्हणजे ती ऐकतील गोरगरीब, हलकेसलके, सारे सारे! कोणत्या माणसांची म्हणाल तर ह्याच माणसांची घेतली. काय नव्हतं तिच्यात? गंगेयाचं एकांतिक मोठेपण, सत्यवतीचं चलाखी खोटेपण, अंबीचं भोळं स्वार्थीपण, काशीचं सेवेकरी थोरपण, अन् सगळ्यांची आपल्या वंशापुरती धडपड! त्या व्यासाला यातूनच दाखवायचं होतं माणसांचं माणूसपण! त्यानं सुरुवात केली. कथा गायिली. अन् जसा वंश वाढत गेला तसा

कथेचा व्यापही वाढला. त्यानं घडलं ते ते पाहिलं, सोपं करून गायलं.

एकजण : अखेरपर्यंत ?

साधू : हो, अखेरपर्यंत !

तोच : अन एवढे तंटे झाले तरी गाणीच गात बसला ?

साधू : नाही रे बाबांनो. त्यानं खूप समजावलं सगळ्यांना. धृताच्या अन् पांडूच्या मुलांना. त्यानं एकट्यानंच नाही, विदुरानं समजावलं, गंगेयानं समजावलं, तरीसुद्धा काय झालं ? धृताच्या मुलांनी पांडूच्या मुलांना जुगारात हरवलं. त्यांच्या बायकोला नागवलं, अन् वनवासाला लावलं. तेव्हा मग त्या व्यासाचं मन पुन्हा उडालं. तो उठला. म्हणाला, ह्या शहाण्यासुर्त्यांना शिकवायचं राहो; अडाण्यांना सांगावं. ते तरी ऐकतील माझा टाहो, की धर्मानं वागा, धर्मानं वागा ! म्हणून तो माघारी फिरला, साळ्याकोळ्यांत शिरला. त्यासाठी आपल्या जुन्या गुहेत रिघला अन् बारा वर्षं इथं राहिला– शाक बेटावर !

सूत : बाबा, तुम्ही !

[ ' बाबा, तुम्ही व्यास ! ' असा गोंगाट होतो. ]

व्यास : [ विषण्ण पण शांत ] होय ! गड्यांनो, मीच तो पाराशर, मीच तो कृष्ण, मीच तो व्यास ! सूता, तुला शिकवलेल्या भारुडाचा कवीही मीच ! वाटलं नव्हतं, तुमची जत्रा अशी होईल म्हणून ! मघा, इथं आलो तेव्हा हा गोळा दिसला अन वाटलं, ' अरे, मी एकटाच व्यास नाहीए ! आपण सारेच व्यास आहोत माणसाच्या वंशाचे ! ' तुम्हांला कळलं नसेल हे बोलणं ! [ बसल्या बसल्या दगडी गोळा लोटून समोर घेतो. सूत तो उठून ढकलायला लागतो. ] हा बघा गोळा. आता ह्याच्यात जर आस घालायचा असला तर आपण आरपार भोक पाडू. होय की नाही ? मग, त्या आसाच्या लांबीचं माप, त्याला म्हणतात व्यास ! मग बघा, हे आरपार भोक कुठंही पाडलं तरी तो व्यास सारखाच राहणार. अन् ह्या गोळ्यात म्हणाल तर असे व्यास किती बसतील त्याची गणतीच नाही ! तसंच आहे माणसाचं. मघाशी कोण म्हणालं : कोळणीचाच वंश हा, तरी ही पोरं अशी कशी निघाली ! तसं काही नाहीए. वंश एकच आहे – तो माणसाचा. त्यात बरावाईट, लहानमोठा कुणी नाही. वंशानं नाही मोठा होत कुणी; धर्मानं वागतो तो मोठा ! माझ्या आईला हे कळलं नाही, मुलांना वळलं नाही, आणि नातवांनी तर जगबूड आणली ! ह्या अंधाऱ्या गुहेत असलो तरी त्यांची लढाई ह्या

डोळ्यांना टळटळीत दिसली. ऐका. अवसेलाच त्यांची लढाई संपली. अवघे सात उरलेत आता. [ थांबतात. ] उरात गजबज होतेय. आक्रोश करावा वाटतंय. [ सावरून ] मंडळी, गेलं पाहिजे. सात उरलेत त्यांचं सांत्वन केलं पाहिजे. सात काय एकच उरला तरी व्यासाला सांगायचं ते सांगत राहिलंच पाहिजे. [ निघतात. ] सूता, मी चाललो. माझ्या मागं तू यांना आणि सगळ्यांना सांगत रहा :

**उभारून दोन्ही बाहो हा मी फोडितसे टाहो ।**
**व्यास माणूस वंशाचा धर्म हिताचा पाळा हो ॥**

◎ ◎

## एकलव्य

### वि. आ. खैरे

फार मौलिक...फार चांगलं असं हे नाटक झालेलं आहे. हे अत्यंत विद्रोही नाटक आहे. हे कुणी नुसतं वाचूनसुद्धा बघितलं तरी त्याच्या मनावर ठसेल. हे विद्रोही नाटक विद्रोहाचं अध्यात्म सांगतं.

दि. के. बेडेकर
प्रकाशनप्रसंगी

एकलव्य कथेचे हे नाट्यरूप...मनस्वी मनोवेधक निःसंशय आहे.

माधव मनोहर
'ललित 'मध्ये

महाभारत हे एक विराट नाट्य आहे. सत्यवतीने व्यासांकरवी घडवलेला नियोगप्रसंग, त्या नाट्यातला एक विलक्षण नाट्यमय प्रवेश. या नियोगास भागी झालेल्या विविध स्त्रियांच्या गुंतागुंतीच्या भावनाकल्लोळांचे चित्रण तर या नाटकात आहेच; त्याचबरोबर भीष्म आणि व्यास या महापुरुषांचे वेगळे दर्शनही त्यात घडते. 'नियोग' या एकाच घटनेत गुंतून न पडता, त्याच्या मुळाशी असलेल्या सामाजिक मूल्यांचाही ते वेध घेते. सर्वांत अधिक म्हणजे व्यासांच्या जीवनाची सुसंगत उकल करते आणि त्यांच्या आक्रोशाचा खरा आशय नव्या रूपात पुढे मांडते.